# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००८ |
| वर्ष | : | नववे |
| अंक | : | ११ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १३४**

MAHMARI 19358/13/1/2000 - TC



विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष नववे / अंक ११ / ऑक्टोबर २००८

## संपादकीय


## संस्कृतीच्या दिशांची दुर्दशा

भारतीय संस्कृती, मराठमोळी संस्कृती या व अशा शब्दांमधील 'संस्कृती'चा अर्थ आता सण व उत्सव साजरे करणे, एवढ्यापुरताच मर्यादित व्हायला लागला आहे. संस्कृती या संकल्पनेची व्याख्या करणे अवघड असले तरी स्थूल मानाने संस्कृती म्हणजे, मानवी समुदायाने आपले जीवन समृद्ध करण्यासाठी निर्माण केलेल्या मूर्त अमूर्त साधनांचा, संकेतांचा समुच्चय होय, असे म्हणता येते. संस्कृतीचे हस्तांतरण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे होत असते. हा वारसा व्यक्तीच्या, व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीमधील निर्णायक घटक असतो. या वारशामध्ये सामाजिक रूढी, परंपरा, धर्माचार, नैतिक मूल्ये व कल्पना इत्यादींचा समावेश असतो.

परंतु, गेल्या वीस बावीस वर्षात संस्कृती जोपासणे म्हणजे राजकारणी मंडळी, गुंड प्रवृत्ती यांच्या ताब्यात गेलेले सण आणि उत्सव, त्यानिमित्ताने केला जाणारा हैदोस, राजकीय पक्षांचे शक्तिप्रदर्शन आणि दहशत असा होऊ लागला आहे. राजकारणातील मोठ्या प्रमाणातील फायद्यांचे गणित मांडत अनेक तरुण मंडळी राजकारणात प्रवेश करताना दिसत आहेत. या तरुणांसमोर कोणतेही प्रेरणादायी आदर्श नाहीत व संरचनात्मक, विकासभिमुख तत्त्वज्ञानाची बैठक नाही. त्यामुळे देशासाठी बांधीलकी बाळगून काम करणे. या वृत्तीऐवजी टोकाची घातक स्वार्थ वृत्ती बळावत आहे. त्यामुळे जे काही दिशाहीन नेतृत्व आहे ते या तरुणांचा शक्तिप्रदर्शनासाठी वापर करत आहे. परिणामी गावोगावच्या वर्षप्रतिपदेच्या स्वागत यात्रांपासून, होलिकोत्सवापर्यंतचे सर्व सण 'आम्हाला पहा आणि फुले वाहा' यासाठी 'साजरे' केले जाताना दिसत आहेत.

धार्मिक सण या उत्सवांचा हा माध्यमासारखा होणारा गैरवापर इतक्या मोठ्या प्रमाणात आहे की, रस्त्याच्या कोणत्याही बाजूला स्वत:च्या अस्तित्वाला सलाम करून घेण्यासाठी फलक लावावे लागत आहेत. जनतेपर्यंत पोहचणे आणि त्यातून जनजागृती करणे या उद्देशाने लोकमान्यांनी सुरू केलेल्या गणेशोत्सवाचे उदाहरण ही मंडळी देतात. काळाचा कोणताही संदर्भ न अभ्यासता सवंग लोकप्रियतेसाठी लोकमान्यांसारख्या नेत्याचे नाव घेण्याचे हे उदाहरण खालावत जाणाऱ्या पातळीचे निदर्शक आहे. गणपतीसारख्या देवतेचा अमक्या गल्लीतला राजा, तमक्या विभागाचा राजा असा उल्लेख करण्याची प्रथा ही मंडळी अस्तित्वासाठी वापरत आहेत.

(पृष्ठ क्रमांक ४० वर)



# स्वप्न साकारत आहे...

हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,
हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे
हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे
नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे
ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,
सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !
हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,
ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे
हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,
न एके यामिनी
दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !
हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले
ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !
हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,
मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां
स्वप्न दिसे साकारले
आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा -
ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण
द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान
ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,
दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला.
भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,
शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती
मनी जे सुजाण,
दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,
ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,
बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,
उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.
युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी
स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई
आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती
विज्ञानसत्रीं सदा जयांची वाहिली मती,
कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,
इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान
भूदल-सागर-सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती
शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती
नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे
सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणीं वसे.
बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,
विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां
नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार
स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार
नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,
बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा

वा. मो. वैद्यकर




वर्ष नववे / अंक ११ / ऑक्टोबर २००८

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १३ वे / अंक ४ था)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री संत निळोबाराय | श्री. शं. बा. मठ | ३ |
| २) | युरोपची तोंड ओळख | सौ. सुनीता खरे | ८ |
| ३) | भारतीय संस्कृती -बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १२ |
| ४) | समस्यायुक्त समाजव्यवस्था? | श्री. पुनम सिंगवी | १८ |
| ५) | शाश्वत आनंद | श्री. यशवंत माने | २० |
| ६) | न मागितलेली भीक, मागे लागलेले कुत्रे | प्रा. मोहन पाठक | २१ |
| ७) | स्थितप्रज्ञ कार्यकर्ता | श्री. सुरेंद्र लागू | २३ |
| ८) | मोबाईल वापर की गैरवापर | श्रीमती वेदवती हब्बु | २६ |
| ९) | 'खरा शिक्षक दिन' | सौ. प्रिती कुळकर्णी | २८ |
| १०) | श्रीमती जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धा - २००८ | सौ. मैत्रेयी शेवडे | ३० |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | ३२ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षणक्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान विधी व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने '**दिशा**' हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा

**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.४०० ६०२**

दूरध्वनी : २५४२ ६२७०

**टीप** : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) ''**विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा**'' या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, पिन कोड व दूरध्वनी कळवावा.

# श्री संत निळोबाराय

सोप्या मराठीत संत परंपरेतील मोठमोठ्या संतांचा परिचय करून देणाऱ्या मालिकेतील हा लेख - संपादक

**संक्षिप्त माहिती :**

निळोबारायांचे संपूर्ण नाव नीळकंठ मुकुंदपंत कुलकर्णी. हे पिंपळनेरास राहिले म्हणून पिंपळनेरकर या नावाने ओळखले जातात. हे देशस्थ ऋग्वेदी आध्वलायन शाखेचे ब्राह्मण. यांच्या घराण्याचे मूळ नाव मकासरे. गावचे जोशी व कुलकर्णीपण यांच्या घराण्याकडे होते. निळोबारायांचा जन्म नेमका कोणत्या साली झाला हे निश्चितपणे सांगता येत नाही. मात्र त्यांचे समाधी वर्ष १७५३ मानले जाते. निळोबारायांनी आईवडिलांच्या आग्रहामुळे विवाह केला. काही दिवस कुलकर्णीपण केले. पण त्यांचे मन त्यात रमले नाही. आईवडिलांच्या पश्चात ते अधिकच विरक्त झाले. लहानपणापासूनच त्यांचा कल ईश्वरी उपासनेकडे असल्याने तरुण असतानाच राजसेवा (कुलकर्णीपण) सोडली व ईश्वर सेवा पत्करली.

निळोबारायांचे घरचे वातावरण सुसंस्कारांचे होते. त्यांनी ज्ञानेश्वरी, नाथभागवत, आणि तुकाराम गाथेची पारायणे केली. वारीतील संतसंग अनुभवला. विरक्तीनंतर त्यांच्या जीवनाला वेगळेच वळण मिळाले. आणि ते आजीवन विठ्ठल उपासनेत रमले.

**महिपतबोवा :**

संत चरित्रकार महिपतिबोवा ताहराबादकर (१७१५-१७९०) आणि निळोबाराय समकालीन होते. उभयता गुरुबंधूही होते. त्यांचा भक्तिविजय हा ग्रंथ १७६२ साली म्हणजे निळोबाराय यांच्या समाधीनंतर दहा वर्षांनी तयार झाला. त्यातील निळोबारायांच्याबद्दलची माहिती निश्चितच महत्त्वाची आणि ग्राह्य ठरते. महिपतीनी लिहिलेल्या सेहेचाळीस ओव्यांत मुख्य भर चमत्कारावर दिलेला आहे. पण त्यांनी निळोबांच्या जीवनव्रताचे वर्णन मोठे मार्मिक केले आहे.

नेणे मान दांभिकपणा। सद्भावे करी हरिकीर्तन।

पुरातन संतांची वचने बोलोन। संत चरित्रे वर्णावी।

मुले लेकुरे सर्व असती। परी माझी ही नाठवे चित्ती।

सहज मिळेल ते अयाचि वृत्ती। त्यातही अतिथी पूजावा।

हे निळोबारायांचे विरक्त जीवनाचे वर्णन मोठे बोलके आहे.

**परमार्थ प्रवास :**

कुलकर्णीपणपासून स्वेच्छेने मुक्त झाल्यानंतर निळोबाराय पंढरीच्या वाटेवर निर्धाराने निघाले. सारा वेळ ते हरिकथा वाचन, भजन, संकीर्तन यात घालवू लागले. त्यांनी सत्संग व देव दर्शन यासाठी अनेक तीर्थक्षेत्रे पाहिली. अखेर पंढरपूरला आले. तेथे साधना सुरु केली.

श्री तुकोबांचा आपल्याला अनुग्रह व्हावा, अशी निळोबांची इच्छा होती. त्याप्रमाणे तुकाराम महाराजांना त्यानी वेळोवेळी प्रार्थनाही केली होती. पुढे कधीतरी गुरुपदेश देऊ व तुला अनुग्रह दिल्याशिवाय मी निजधामास जाणार नाही असे श्री तुकाराम महाराज यांनी त्यांना आश्वस्त केले. मात्र असे घडले की श्री निळोबाराय पिंपळनेरला गेले असता महाराजांचे सदेह वैकुंठ गमन झाले. निळोबांना खूप वाईट वाटले. त्यांनी ठरविले महाराज प्रगट होऊन अनुग्रह करतील तरच जीवनाचे सार्थक होईल अन्यथा जीवन व्यर्थ आहे.

याप्रमाणे निश्चय करून इंद्रायणी काठी बसून त्यानी ४२ (बेचाळीस) दिवस अन्नपाणी वर्ज करून महाराजांचा धावा केला. निळोबांचा असा दृढ निश्चय पाहून प्रत्यक्ष श्री पांडुरंगाने त्याना दर्शन दिले. पण निळोबांचे समाधान झाले नाही. त्यांना श्री तुकाराम महाराजांचेच दर्शन व्हावयास पाहिजे होते. त्यावेळचा निळोबारायांचा अभंग प्रख्यात आहे. श्री निळोबाराय पांडुरंगाला विचारतात -

येथे तुजलागी बोलाविले कोणी। प्रार्थिल्या वाचूनि आलासी का?।

प्रलहाद कैवारी दैत्याशी दंडाया। स्तंभी देवराया प्रगटोनी।

तैशापरी मजला नाही बा संकट। तरी का फुकट श्रम केला।

निळा म्हणे आम्ही नोळखूचि देवा। तुकयाचा धावा करीतसे।

हा निळोबाचा निर्धार पाहून पांडुरंग आल्या पावली परत गेले. शेवटी तुकाराम महाराजांनी येऊन त्याना दर्शन दिले निळोबा म्हणतात -

येवुनिया कृपावंते। तुक्यास्वामी सद्गुरुनाथे।

हात ठेविला मस्तकी। देऊनी प्रसाद केले सुखी।

सद्गुरुंची थोरवी वर्णन करताना निळोबा म्हणतात -

जगद्गुरु तुका अवतार नामयाचा।

संप्रदाय सकळांचा येथूनिया।

निळा म्हणे मज उपदेश केला।

संप्रदाय दिला सकळ जना।

श्री तुकारामांनी अनुग्रह करताना टाळवीणा या गोष्टी निळोबाना दिल्या. सदर वस्तू सांप्रत 'वासकर' घराण्याकडे असल्याचे सांगितले जाते.

**अनुग्रहानंतर :**

निळोबारायांनी तुकोबारायांच्या अभंगांचा कसून अभ्यास केला.

मन विश्रांती पावले। गुरुचरणी स्थिरावले।

असे त्यांचे झाले. ते म्हणतात -

पूर्ण केला पूर्ण केला। पूर्ण केला मनोरथ।

घरा आले घरा आले। घरा आले कृपाळु।

सांभाळिले सांभाळिले। सांभाळिले अनाथा।

केला निळा केला निळा। केला निळा पावन।

धन्य झालो कृपा केली। भेटी दिधली अवचिती।

असे गुरुभेटीचे वर्णन निळोबारायांनी केले आहे. ब्रह्मस्वरूपात तुकोबाराय शिष्यास बोध करतात. ते मानवी वेषधारी भासल्याचे निळोबाराय सांगतात. महाराजांची अवचित भेट झाली त्यावेळी स्फुरलेले श्लोक -

तयाचे पदी चित हे लीन झाले।

नव्हे भिन्न त्या सामरसी मिळाले।

अकस्मात हा लाभ योजूनि आला।

गुरु निळ्यासी तुकोस्वामी झाला।

सिद्ध दत्तात्रेयांनी स्वये येउनी।

जनार्दन स्वामीना तत्त्वबोध दिला. त्या प्रमाणे हा गुरुबोध घडला असे नमूद करून निळोबाराय म्हणतात -

तुकोस्वामींचा आशीर्वाद होता।

बरा साधला सर्व हितार्थ आता।

अशी कृतकृत्यता व्यक्त करतात.

नेणो काय सुकृत होते निजाये।

होते जोडिले जन्म जन्मान्तरीचे।

अशी वृत्ती जागोजागी प्रकट केली आहे. नित्यानंदी निमग्न झाल्यावर त्यांनी देवाशीच संवाद केला आहे.

काय द्याल तुम्ही देवा।

घ्यावी आमुचीच सेवा।

निळा म्हणे हाच माझा ऐश्वर्य भोग।

काया वाचा मनसा अवघा पांडुरंग।

असा त्यांचा परम संतोष आहे. तसेच सद्‌गुरु रूपात देव सदैव पथ दर्शक आहे. तुकोबामय झालेल्या निळोबारायाने आपली कर्मभूमी शिरुर जवळच्या पिंपळनेर गावी केली. इथे देहू प्रमाणेच त्यानी एक विठ्ठल मंदिर उभारले आणि नित्य नाम संकीर्तनात रमले.

**अभंग संपदा :**

निळोबांचे बहुतेक अभंग मुद्रित स्वरूपात उपलब्ध आहेत. त्यांची संख्या सोळाशेच्या घरात जाते. हे अभंग तुकाराम तात्यांनी प्रथम प्रकाशित केले. पुढे आवरे गाथेच्या पाचव्या खंडात १९०८ साली ते पुन: प्रकाशित झाले. त्यांच्या अभंगवाणीत समकालीन समाजाचे माहिती वजा दर्शन घडते. तेव्हाचे रीतीरिवाज, समजुती, वस्त्रालंकार याचे तपशील ते देतात. क्वचित जनस्थिती, आर्थिक अवस्था, राजकीय परिस्थिती नमूद करतात. पण त्या अभंगात तुकोबाराया सारखा परखडपणा नाही.

प्रासादिकता, मधुरता, सुबोधता हे काव्यगुण येथे दिसतात. कृष्णक्रीडा, गौळणी, विरहिणी, पंढरी महात्म्य, श्री विठ्ठलाचे गुणवर्णन, साधनेचे महत्व, मुक्तीपेक्षा भक्तीचा महिमा, संतस्तुती हे सर्वमान्य विषय इतर संताप्रमाणे इथेही आहेत. साधक परमात्मा संवादात उत्कटता आहे. गौळणी काव्य गुणांनी अलंकृत आहेत. तुकोबारायांची प्रशंसा भावपूर्ण आहे. काव्य प्रयोजनाबद्दल नामदेव महाराज म्हणतात -

परहुनि परते घर। तेथे नांदू निरंतर।

नाचू कीर्तन रंगी। ज्ञान दीप लावू जगी।

निळोबाराय म्हणतात -

निळा म्हणे आपुल्या गोडी। तया आवडी स्तवनाची।

माझी वाचा आणि मन। केली पावन कीर्तने।

फुटले धरण आला लोंढा। नावरे तोंडा माझियावो।

कृपा धने दृष्टी केली। वाचा अर्पिन्नली बोधपरे।

प्रतीती विद्युल्लता झळकती।थेंबुरे पडती ब्रह्मरसे।

निळा म्हणे पिकले पीक। आले सकळिक भोगासी।

नाचे बोलविले देव। मज काय हे होते ठावे।

सहज नामे आळविता। ओघ आला हा अवचिता।

**नाम साधना :**

नामदेवराय हे नामभक्तीचे उद्‌गाते ठरतात. निळोबारायांनी त्यांचे अनुकरण निष्ठेने केले. नाम हे सर्वधर्माचे सार असून नाम संकीर्तनानेच सर्व कार्ये सिद्धीला जातात. जीवनाचे सार्थक होते असा निळोबारायांचा स्वानुभव आहे. ते म्हणतात हरिकथा आणि नाम संकीर्तनात साधक रमला म्हणजे -

निमग्नता जाली मन बुद्धी चित्ता।

असे होऊन जाते.

नामवाचे श्रवणी कीर्ती। पाउले चित्ती समान।

हा जीवन सार्थकी लावण्याचा उपाय भासतो.

*ठेंगू माणसे आपली घरे उंच व आलिशान बनवतात.*

ध्यानीमनी उमटलेले नाम जनीवनीही भगवंताचे रूप दावू लागते. गुरुकृपा, नित्य नाम जपाची साधना, संतांची संगती, विशुद्ध भक्तिभाव यांच्या बळावर कुणालाही ईश्वराचा साक्षात्कार घडू शकतो.

जेथे पाहे तेथे आहे। न पाहाताही राहे कवळुनी।

असे साधकाला होऊन जाते.

**गौळणी :**

गौळणीचे अभंग तत्त्व चिंतनाच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहेत. गोकुळातील भगिनींच्या सहज संवादातून सुगम व मधुर असे नियामक अस्तित्वाचे दर्शन घडवितात. उदा. अवनी कासयाची? प्रचंड पृथ्वी कशाने तयार झाली? काय पिंजून गेले गगन? निर्मिला हुताशन कासयाचा? विश्वाच्या पोकळी वायू कोणी भरला? या सर्व प्रश्नांची उत्तरे निळोबाची गौळण देते.

अपार चांदणे फुलौरा पर्जन्याचिया करूनि धारा।

जेणे पिकविले धरणीने तो एक परमात्मा होय।

तोकडे ज्ञान विज्ञान कळणाऱ्या लोकांना आकलन सहजपणे होतेच असे नाही. त्यासाठी गौळणीसारखी ईश्वर चरणी समर्पण बुद्धी असली पाहिजे.

नयनाचे हि नयन। प्राणाचेही प्राण।

श्रवणांचे ही श्रवण। तेच रसनेचि रसना।

अर्थात् भगवद् तत्त्व हेच साऱ्याचे नियामक तेच सर्वत्र भरून उरले आहे. या जाणिवेने जगले पाहिजे.

गोपिकांची विरह व्यथा चितारताना ते सहजपणे यशोदानंदन बाळकृष्णाचे रूपचित्र उभे करतात.

**संतकृपा :**

एका नाम जपा खेरीज अन्य साधनांचा मुलाहिजा ज्यांना वाटत नाही ते खरे संत होत. जगतीचा माया घाट ओलांडण्यासाठी ते पायवाटा तयार करतात. आपल्याला बहकविणारे अनेक भेटतात, संत याच अशा जगापासून आपल्याला वाचवितात. आपले स्वत:चे सारे पुण्य ते उदारपणे बहाल करतात. इतरांना भरभरून कृपावर्षाव करतात.

संत उदार उदार। लुटविले निज भांडार।

सोडोनिया जाती पोती। कृपा करूनि दिधली हाती।

निळोबांना आलेला अनुभव -

सहजचि होतो उभा। संत सेवेचिया लोभा।

तव काढिला निक्षेप। हाती दिला तो अमूप।

नाहीची अंतजया। किती माप लावू तया।

निळा म्हणे दिवस राती। न पुरे करिता गणती।

सत्संग ही जीवनाला सुयोग्य गती देणारी सर्वात मोठी शक्ती आहे. निळोबानी ही शक्ती साध्य करून आत्मोद्धार करून दाखविला. ते म्हणतात -

मार्ग दावोनि गेले आधी। दयानिधि संतपुढे।

तेणेही पंथे चालो जाता। न पडे गुंता कोठे काही।

मोडोनिया नाना मते। देवो सिद्धांते सौरसु।

निळा म्हणे ऐसे संत। कृपावंत सुख सिंधू।

**साधक व परमात्मा :**

निळोबारायांनी संत महात्म्यांचे अनुकरण सामर्थ्याने केलेले आहे. ते भक्त या नात्याने देवाशी बोलत राहात, आणि देवालाही भक्ताशी बोलण्यास लावतात.

तुम्ही माझे मी तुमचा। आहे चि ठायीचा ऋणानुबंध।

असे ते देवाला सांगतात. कधी देव भक्ताला म्हणतो -

*स्वत:च्या दोषांचे समर्थन करणारा खरा अंध होय.*

भोजनकाळी पाचारावे। मजही घ्यावे सांगावे।

टाकेल ते करीन सेवा। माझा न करावा अव्हेर।

येणे प्रमाणे भक्त देवाचा संवाद यातील गोडी अवीट आहे. भक्त व देव यांची इतकी सलगी असते. उभयता प्रेमालाप करतात.

**वारकरी पंथ :**

साधी राहणी उदात्त विचारसरणी यांचा आदर्श वारकरी पंथाने जोपासला. निळोबाराय या आदर्शाची एक प्रतिमूर्ती आहेत. ते विरक्त वृत्तीने संसार करीत परमार्थ जगणारे होते. केवळ विठ्ठल भक्तीच्या द्वारे ते महत्पदी पोहोचले. त्यांच्या जीवन चरित्राविषयी उपलब्ध होणारी माहिती कमी आहे. जी आहे ती दंतकथा आहे. निळोबा आचारविचाराने जगले. तेच त्यानी अभंगात वर्णिले. त्यांचे अभंग हेच त्यांचे चरित्र. तुकोबारायानंतर वारकरी संप्रदायाचा थोर वारसा निळोबारायांनी समर्थपणे सांभाळला. संत तुकाराम महाराजानंतर कीर्तन करायचे ते फक्त निळोबारायांच्या अभंगावर असा वारकरी पंथीय कीर्तनकरांचा संकेत आहे. ही शेवटचे संत कवी म्हणून निळोबांची खूण आहे.

**स्मृती चिन्हे :**

स्मृति स्थान पिंपळनेरच दाखविले जाते. हे लहानसे गाव शिरूर पारनेर मार्गावर आहे. लहान सहान टेकड्यांनी वेढलेला सारा परिसर आहे. प्रवराकाठ आहे. गावात पिंपळेश्वराचे पुरातन देवालय आहे. एक जुनाट बहिरोबा मंदिर आहे. निळोबांनी उभे केलेले विठ्ठल मंदिर अगदी लहान असून ते त्यांच्या घराला लागून आहे. देहू प्रमाणे विठ्ठल रखुमाईच्या मूर्ती आहेत. नदीकाठी दोन दगडी छोटीशी वृंदावने दाखविली जातात. एक पुत्र भिवाचे दुसरे निळोबाचे. प्रतिवर्षी फाल्गुन शुद्ध प्रतिपदेला निळोबांचा उत्सव साजरा होतो.

**देवभक्त एकरुपता :**

आमोद न सोडी कर्पुर। किंवा प्रभेते रविकर।

तैसाचि देव आणि भक्त। येरयेरी विराजीत।

जेवी साखरे ते गोडी। चंदन सौरभ्पन सोडी।

निळा म्हणे अवकाश नभ। दोन्ही एकाचे स्वयंभ।

**श्री. शं. बा. मठ**

६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

दूरध्वनी : २५३३२०३०

●●●

**लेखन सहकार्य**

**आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्यापन विषयातील नवीन घडामोडी, नवीन ज्ञान क्षेत्रे याबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत. आपले लेख आमच्या कार्यालयाकडे पाठवावेत. लेख स्वीकारण्यासंबंधीचा संपादकांचा निर्णय अंतिम असेल.**

# युरोपची तोंड ओळख

*दिशा मधून आजवर अनेक प्रवास वर्णने देण्यात आली आहेत. या वर्णनांच्या निमित्तांना पर्यटकांच्या नजरेस पडलेले देश दिशाच्या वाचकांपर्यंत पोहचवणे हा या मागील हेतू. संस्कृत साहित्याचा व्यासंग असणाऱ्या व ग्रंथालयसेवेतून निवृत्त झालेल्या सौ. सुनीता खरे यांनी केलेल्या प्रवासाचे हे वर्णन- संपादक*

**पूर्वार्ध :**

मनुष्य पर्यटन का करतो? किंवा तुम्ही पर्यटनासाठी का बाहेर पडता? असा प्रश्न केला तर विविध लोक विविध प्रकारची कारणमीमांसा देतील. कुणी दररोजच्या त्याच त्याच जीवनाचा आलेला कंटाळा जावा म्हणून पर्यटन करेल, तर कोणी विविध ठिकाणे पाहण्याची हौस म्हणून करेल, कुणी सृष्टीसौंदर्याच्या अवलोकनार्थ जातो म्हणेल तर कुणी विविध ठिकाणचे लोक त्यांच्या चालीरीती, तेथील राजकारण, समाजकारण त्यांचा अभ्यास करू म्हणेल, तर कोणी एखादा शैक्षणिक अभ्यासक्रम पुरा करीत असेल. अर्थातच, ज्याचा जसा दृष्टिकोन त्याला साजेसे ठिकाण पर्यटनार्थ निवडले जाईल. केसरीची युरोपची तोंड ओळख (Glimpses of Europe) ही सहल निवडताना आम्ही उभयता काय विचार केला होता?

पर्यटनाच्या आवडीमुळे, भारतातील बरेचसे भूभाग पाहून झाले होते. नेपाळच्या पशुपतीचेही दर्शन झाले होते आणि आता एखादी चांगली परदेशवारी घडावी अशी इच्छा होती. परदेश वारीला जाणारे बरेच जण प्रथम सिंगापूर, बँकॉक इ. ठिकाणे पसंत करतात असे आम्ही पहात होतो. परंतु ह्या सर्व वसाहती भारतासारख्याच म्हणजे जेथील भूभागावर इंग्रजांनी राज्य केले अशा होत्या. तेव्हा मनात विचार आला इंग्रजांचा मायदेशच पहायला जावे. राज्यकर्त्यांची भूमी पहावी, त्यांच्या आसपासचे प्रदेश पहावेत. इंग्लंड, फ्रान्स, इटली, जर्मनी इ. प्रत्येक देशाला स्वतंत्र इतिहास आहे, स्वतंत्र सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक पार्श्वभूमी आहे हे लक्षात घेतल्यावर युरोपलाच जावे असे प्रकर्षाने वाटू लागले व मग आपल्या खिशाला परवडेल अशी सहल शोधीत असता केसरीची Glimpses of Europe ही सहल करण्याचे आम्ही ठरविले.

ह्या पृथ्वीतलावरील ज्या ज्या देशांनी जगाला, अखिल मानवजातीला काही दिले, काही शिकविले, त्यांची यादी करू गेले तर त्यामध्ये भारत, चीन, जपान ह्या पौर्वात्य देशांबरोबर ग्रीस, इटली, फ्रान्स, ऑस्ट्रिया, जर्मनी यांचीही नावे आपल्याला समाविष्ट करावी लागतील. ग्रीसने आपल्याला उत्तम राज्यपद्धतीचे ज्ञान दिले. तेथील नगर राज्यांमध्ये आपसांत स्पर्धा असे. त्या स्पर्धेला विधायक वळण मिळावे म्हणून इसवी सनापूर्वी सातशे वर्षे ग्रीसमध्ये ऑलिम्पिक सामने सुरू झाले. मॅरेथॉन येथे ग्रीक व पर्शियन सेना एकमेकांशी लढत होत्या. ग्रीक सैन्याने पर्शियन सेनेचा पाडाव केला तेव्हा ही आनंदायी वार्ता घेऊन एक युवक तेथून अथेन्सपर्यंत (सुमारे ४२ कि.मी) पळत गेला. येथेच मॅरेथॉन रेस जन्माला आली. साधी राहणी ग्रीसनेच शिकवली. होमर, सॉक्रेटीस, ॲरिस्टॉटल, युक्लीड, आर्किमिडीज हे सर्व ग्रीक होते. भूमिती, विज्ञान, वैद्यक, तत्त्वज्ञान, नाट्यशास्त्र, राज्यशास्त्र अशा विविध क्षेत्रांमध्ये ग्रीसने आपले योगदान दिलेले आहे. रोमचीही कथा वेगळी नाही. एकेकाळी सर्व युरोपात धार्मिक साम्राज्य गाजविणाऱ्या पोपचे निवासस्थान रोममध्ये व्हॅटिकन येथे आहे. आजच्या पाश्चिमात्य जीवनपद्धतीचा विकास इटलीमध्ये झालेला आहे. अद्वितीय कलाकार, चित्रकार, शिल्पकार, विचारवंत, साहित्यिक, राजकारणी अशी अनेक नररत्ने इटलीने निर्माण केली.

ग्रेट ब्रिटन म्हणजे विराधाभासाचे एक गाठोडे आहे असे म्हटले जाते. येथील लोकशाही राजवाड्यात जन्मली. ब्रिटिश नागरिक लोकशाहीचा पुरस्कार करतात पण राजघराण्याला खूप मानतात. इंग्लिश परंपरा म्हणूनच मुद्दाम अभ्यासण्याजोग्या आहेत. फ्रान्समध्ये व्यक्तिस्वातंत्र्याचा खूप आदर केला जातो. ललित कलांचा वारसा तर फ्रान्सने जगाला दिलाच आहे पण स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही क्रांतिकारी विचारत्रयीही फ्रान्सनेच जगापुढे ठेवली. अशा या विविध विचारधारांचा परिचय व्हावा हा युरोपवारीच्या मागील महत्त्वाचा विचार असतो. युरोप हे नाव क्रीट बेटावरील इयूस ह्या देवाची पत्नी युरोपा, हिच्यावरून पडले आहे. जुने ते जपताना नव्याचाही अंगीकार युरोपिअन देशांनी सहजनेते केला. खऱ्या अर्थाने पर्यटनाचा विकास युरोपमध्ये झाला आहे असे दिसते. प्रत्येक ठिकाणी माहितीपत्रक, चित्रे मिळतात. टेलिफोनसारख्या सुविधा टिटलीस पर्वतावर तसेच टॉप ऑफ युरोप म्हणजे युंगफ्राओयुंग येथेही प्रवाशांसाठी उपलब्ध होत्या. पर्यावरणाची किंवा निसर्गाची हानी न करताही अत्याधुनिक औद्योगिक व संगणकीय सुविधांचा उपयोग कसा करून घ्यावा, याचा वस्तुपाठ हॉलंड, स्वित्झर्लंड, जर्मनी येथे फिरताना मिळतो.

मिलान एअरपोर्टवर एक हॅरी पॉटर उभा केलेला होता. येणारे जाणारे कुतूहलाने ह्या Nimbus 2006 असे लिहिलेली गन हाती घेतलेल्या हॅरी पॉटरच्या पुतळ्याकडे पहात होते. एका युरोपिअन मुलाने त्याचा मुका घेत स्वत:चा फोटो काढून घेतलेलाही पाहिला. मिलान - लंडन या विमानाने जाताना वाटेत आल्पसच्या हिमाच्छादित पर्वताशिखरांचे दर्शन घडले. आमचा हा पहिलाच विमानप्रवास. भर उन्हात खाली चमचमणारी हिमशिखरे, त्यांच्या आसपास विहरणारे पांढरे स्वच्छ ढग आणि त्यांच्या बरेच वरून आमचे विमान जात होते. आपण जादूच्या गालिच्यावरूनच जात आहोत, असे वाटत होते आणि एवढ्या उंचीवरून आपण जात आहो म्हणून भीतीही वाटत होती. डॉ. होमी भाभांचे विमान ह्याच आल्प्सच्या पर्वतराजीवर असताना कोसळल्याचे वृत्त मनात ताजे होत होते.

लंडनला मादाम तुसाचे मेणाचे म्युझियम पाहिले. पण तो रविवार असल्याने तेथील गर्दीमुळे निवांतपणे पुतळे पहाणे जमले नाही. दुसरे दिवशीच्या लंडनच्या धावत्या दर्शनामध्ये थेम्स नदी, लंडन आय, लंडन ब्रिज, वेस्ट मिन्स्टर ॲबे, बकिंग हॅम पॅलेस, पिकॅडली सर्कस, हाईडपार्क इ. चा समावेश होता. हाईडपार्क हे येथील प्रसिद्ध उद्यान. प्रवेशद्वार म्हणून एक मोठी संगमरवरी कमान आहे. आत शिरले की पार्कचा प्रचंड विस्तार जाणवतो. या बागेभोवती लंडनसारखे मोठे शहर आहे असे आत जाणवतही नाही. हे खऱ्या अर्थाने सार्वजनिक उद्यान आहे. कोणीही या मनोरंजनासाठी, मोर्चा काढण्यासाठी, हरताळ पाडण्यासाठी, कशा साठीही या. येथेच 'सोप बॉक्स ऑपेरा'ची जागा आहे. कोणीही वक्त्याला येथे संपूर्ण भाषण स्वातंत्र्य आहे. मात्र भाषणाचा विषय देशहित विरोधी आणि हीन किंवा अश्लील असता कामा नये असा येथील दंडक आहे. आपल्या येथे हल्ली जागोजाग निर्माण झालेले 'अत्रे कट्टे' हे ह्याचपासून प्रेरणा घेऊन निघालेले आहेत. ह्या पार्कमध्ये तीन तीनशे वर्षांच्या जुन्या प्रचंड वृक्षांची गर्दी आहे. ते हवा शुद्ध करीत असतात म्हणून या व आसपासच्या पार्क्सना 'लंडनची फुप्फुसे' असे म्हणतात.

इंग्लंडच्या राजांचे राज्यभिषेक येथील 'एडवर्ड द कन्फेसर चॅपेल' मध्ये होतात. किंग हेरॉल्डच्या राज्यारोहणाच्या वेळची 'कॉरोनेशन चेअर' येथे जपून ठेवण्यात आली असून तदनंतरच्या प्रत्येक राजाच्या राज्यारोहणप्रसंगी ती वापरली जाते.

थेम्स नदीच्या किनाऱ्यावरील लंडन आय म्हणजे आपल्या येथे जत्रांमध्ये असते, तसे पण खूप मोठे असे एक चक्र आहे. त्यांत अनेक पाळणे आहेत. आपला

पाळणा सर्वांत उंच गेला की तेथून लंडन शहराचे मनोहारी दृश्य दिसते.

ब्रिटिश कोर्टांत नि:पक्षपाती न्याय मिळतो असे समजल जाते. मात्र इतिहासामधली अनेक वळणे पार करूनच इंग्लीश न्याय आजच्या गौरवास्पद स्थितीला येऊन पोहोचला आहे. पूर्वी येथेही न्याय अग्निदिव्य इ. मार्गांनीच होत असे. लंडनच्या 'ओल्डबेली' या फौजदारी कोर्टाच्या भव्य इमारतीवरील घुमटावर 'टेमिस' ह्या ग्रीक न्यायदेवतेचा पुतळा आहे. तिच्या एका हातात समतोल न्यायाचे प्रतीक म्हणून तराजू व दुसऱ्या हातात अपराध्यांना शासन करण्यासाठी तलवार आहे.

लंडनच्या वॉटर्लू या भूमिगत रेल्वे स्थानकावरून आम्ही पॅरिसच्या नॉर्ड येथे जाण्यासाठी युरोरेलमध्ये बसलो. ही समुद्राखालून काही अंतर जाणारी रेल्वे आहे. समुद्राखालून जाणारे अंतर ओलांडले की लगेचच घरांच्या बांधणीतला फरक जाणवू लागतो. लंडनची बहुतेक घरे दगडी बांधणीची, आपल्या फोर्ट विभागांतील बोरीबंदर रेल्वे स्टेशन, मुंबई विद्यापीठ, मुंबई उच्च न्यायालय इ. वा वास्तूंची आठवण करून देणारी, उतरत्या कौलारू छपरांची आणि वर चिमण्या असलेली. आता जरा वेगळ्या धाटणीची म्हणजे लोखंडी कठडे, असलेल्या बाल्कन्यांची घरे दिसू लागली.



**सीन नदी**

पॅरिसला सीन नदीच्या पात्रातून क्रूझ राईडचा कार्यक्रम होता. ही नदी पॅरिस शहरामधून वहाते. तीवर बरेच पूल बांधलेले असून त्यांच्या खालून नदीमधून सुमारे ४५ मिनिटांचा हा फेरफटका होता. दोन्ही तीरांवर पॅरिसच्या प्रसिद्ध इमारती दिसत होत्या. सर्वत्र दिव्यांचा झगमगाट होता. आयफेल टॉवर रोषणाईने झगमगत होता. रॉयल पॅलेसमध्ये असलेले डिसेबल्स हॉस्पिटल होते.

लंडनच्या तुलनेत पॅरिस येथील रस्ते व चौक अधिक विस्तीर्ण आहेत. परंतु स्वच्छता, टापटीप ह्याबाबत मात्र लंडनच अग्रेसर आहे. शांसेलीझे हा पॅरिसचा प्रमुख रस्ता. याच्या पश्चिम टोकाला एक मोठे सर्कल आहे. येथे तब्बल बारा रस्ते येऊन मिळतात. हाच 'प्लेस चार्लझ् द गॉल' ह्या नावाने ओळखला जाणारा चौक. याच चौकात 'आर्च दि ट्रायंफ' ही आपल्या विजयी सेनेचे पॅरिसमध्ये स्वागत करण्यासाठी नेपोलियनने उभारलेली कमान आहे. हिच्या दोन्ही बाजूंवर सुंदर शिल्पचित्रे आहेत. रूद ह्या शिल्पकाराचे 'द मार्सेली' हे सुप्रसिद्ध शिल्प येथलेच. या कमानीमध्ये एक अमर जवान ज्योत अखंड तेवत असते.

शांसेलीझे रस्त्याच्या दुसऱ्या टोकाला 'प्लेस द ला काँकॉर्ड' नावाचा चौक आहे. येथे मध्यभागी २०० टन वजनाचा एक ओबेलिस्क (निमुळता दगडी स्तंभ) उभा आहे. इजिप्तमधील लक्सॉर इथल्या मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या डाव्या व उजव्या बाजूला असे दोन स्तंभ उभे होते. त्यातील उजव्या बाजूचा हा स्तंभ इजिप्तच्या राजाने फ्रान्सच्या राजाला भेट दिला असे सांगतात. स्तंभावर जुन्या ईजिप्शियन लिपीत मजकूर खोदलेला आहे.

लुव्र म्युझियम हे पॅरिसचे प्रसिद्ध म्युझियम. जग प्रसिद्ध 'मोनालिसा'चे पेंटिंग येथे आहे. पण आमच्या सहलीच्या पॅकेजमध्ये मादाम तुसा खेरीज कुठलेही म्युझियम पहाण्याचा योग नव्हता. दुपारी 'आयफेल टॉवर' पहावयास गेलो. ११५० फूट उंचीचा हा टॉवर असून एकावेळी सुमारे



लुव्र म्युझियम



आयफेल टॉवर

५० जण लिफ्टने तिसऱ्या मजल्यापर्यंत जाऊ शकतात. टॉवरच्या चारही बाजूंनी बाल्कनी असून तेथून पॅरिसचे नयनरम्य दर्शन घडते. वरपर्यंत चढून जाण्यासाठी पायऱ्यांचा जिनाही असून काही दिवस स्वत: आयफेल वरच्या मजल्यावर जेथे रहात असे ती खोली आजही सर्वांना दाखविली जाते. इ. स. १८८९ हे फ्रेंच राज्यक्रान्तीचे शतकमहोत्सवी वर्ष. त्यानिमित्त 'पॅरिस एक्स्पोझिशन' या जागतिक प्रदर्शनासाठी एक उत्तुंग टॉवर उभारायचा असे फ्रेंच सरकारने ठरविले. टेंडर्स मागविण्यात आली आणि आलेल्या सुमारे ७०० टेंडर्सपैकी आलेक्सांद्र गुस्ताव आयफेल ह्या वास्तुविशारदाचे टेंडर मंजूर करण्यात आले. २६ जानेवारी १८८७ ते २८ मार्च १८८९ ह्या काळात म्हणजे बरोबर २ वर्षे; २ महिने व २ दिवस इतक्या कालावधीत हा उभारला गेला. जून १८८९ मध्ये इंग्लंडचे तत्कालीन पंतप्रधान प्रिन्स ऑफ वेल्स, सातवे एडवर्ड यांच्या हस्ते त्यांचे उद्‌घाटन झाले. इ. स. १९२९ मध्ये न्यूयॉर्कमध्ये 'क्रायस्कर' व नंतर 'एम्पायर स्टेट' ह्या इमारती बांधल्या जाईपर्यंत आयफेल टॉवर हा जगातील सर्वांत उंच वास्तू म्हणून ओळखला जाई. त्याचा पाया १०० चौरस मीटर आहे असे सांगतात. घडीव लोखंडी जाळीकाम असलेला हा मनोरा वजनाने ७३०० टन असल्याचे सांगितले जाते. दुसऱ्या महायुद्धात फ्रान्स जर्मनीच्या अधिपत्याखाली असताना हा टॉवर तोडून त्याचे लोखंड युद्धकार्यासाठी वापरण्याचा जर्मनीचा बेत होता. आज पॅरिसची ओळख मानल्या गेलेल्या ह्या टॉवरची तत्कालीन लोकांनी मात्र 'लोखंडाचा बेंगरूळ ढीग' म्हणून अवहेलना केली होती परंतु वास्तुमाध्यम म्हणून घडीव लोखंड, पोलाद यांसारख्या धातूंचा केलेला वापर हे ह्याच्या बांधणीचे वैशिष्ट्य आहे असे आज मानले जाते. प्रत्येकी २६ चौरस मीटर क्षेत्रमर्यादेच्या चार मेसनरी पिअर्सच्या आधारावर हा मनोरा उभा आहे. ह्या स्तंभापासून लोखंडी जाळीकाम असलेले चार कलते स्तंभ उभारलेले असून ते १८९ मीटर उंचीवर एकमेकांत मिळाले आहेत. मनोऱ्याच्या प्रत्येक मजल्यावर उपाहारगृहे व प्रयोगशाळा असून वरच्या मजल्यावर दूरदर्शनचे प्रक्षेपण केन्द्र आहे. रात्री जेव्हा आयफेल टॉवर रोषणाईने झगमगताना दिसतो, तेव्हा ते दृश्य मंत्रमुग्ध करून सोडते. सीन नदीतील क्रूझच्या डेकवरून हे दृश्य आम्हांला पहावयास मिळाले हा एक दुग्धशर्करा योगच होता.

(पृ. १९ पाहा)

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*शुनःशेप आख्यानाचा संदर्भ घेऊन केलेले विवेचन हा लेखमालेतील पुढील लेख आहे - संपादक*

**(पूर्वार्ध)**

**प्रास्ताविक :**

दिशाच्या मागील अंकात आपण भारतीय संस्कृतीचे बीज हे वैदिक ज्ञान मार्गात आहे हे सांगितले. तसेंच, ह्या बीजात इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती व क्रियाशक्ती ह्या त्रिस्वरूप शक्तींचे सामर्थ्य अंतर्भूत असते व त्या अनादी अनंतापर्यंत जिंवत, चैतन्य स्वरूपांत प्रगट व विस्तारित होण्याचे सामर्थ्य त्याच्या बीजस्वरूपांतच असते असे पाहिले.

आता आपण ह्या 'पुनर्जन्माचे' किंवा बीजसातत्याचे रहस्य व त्यामुळे संस्कृतीच्या वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाचे अस्तित्व व वृद्धी कशी जपली जाते ते पहाणार आहोत.

ह्या संस्कृतीबद्दल पाश्चात्य दर्शनात काय विचार आहे हे ही थोड्याशा सूत्ररूपाने पाहू या व त्यामधील गृहीते व भारतीय बीज संकल्पनेतील सांस्कृतिक वृद्धीच्या दिशा कशा जतन केल्या जातात व आपल्या विशिष्ट संस्कृतीचे स्वरूप एका निश्चित वैश्विक मार्गावर कशी पदयात्रा करत जाते ते पाहणार आहोत.

<u>**डॉ. सत्यप्रकाश सरस्वती, आर्यसमाजीस्ट,**</u> हे आपल्या <u>**आर्यसामज-सिद्धान्त और प्रगति ह्या पुस्तकांत 'सृष्टि की उत्पत्ति,**</u> स्थिती एवं प्रलय' ह्या लेखात म्हणतात,

<u>**''परमात्मा अनादिकाल से है, प्रकृति अनादिकाल से है, पारमात्मा अनादिकाल से सृष्टा है - उसके सम्बंध मे वेदान्त दर्शन के इस सूक्त की सत्यता है**</u>




<u>**''जन्मा, द्यस्य यत:'' (सदा ही वह सृष्टा पोषक और प्रलयकारक है)**</u>

पुढे ते त्याबद्दल आपण मर्त्य मानव जीव जी गोष्ट सतत पाहात असतो त्याकडे लक्ष खेचतात.

<u>**''पिता के वीर्य में जीवात्मा का प्रवेश और माता को गर्भ-कण में उसका अवतरण और मनोमय, प्राणमय और अन्नमय कोशोंका विकास - सभी रहस्यमय है।''**</u>

<u>**आपल्याला मात्र हे रहस्यमय वाटत नाही - का बरे?**</u>

''इतने सरल नाही-जितना हम समझते है। ज्ञान विज्ञान की मानव भाषा मे विकास क्रम का पूर्ण चित्रण करना

असम्भव है। <u>**बीज से अंकूर; अंकूर से तना, तने से वृक्ष का शरीर, उससे फूल और फूल और फल में फिर बीज**</u> - यह तो अतिसूक्ष्म विकास की अत्यन्त भोंडी और अपूर्ण व्याख्या है। पर इतने से हमे संतोष रखना चाहिए और इसी प्रकार सांख्य (सांख्य तत्वज्ञान) दर्शन का विकास क्रम भी अपूर्ण है, फिर भी साधारण तत्ववेत्ता को उसी से सन्तोष रखना चाहिए।

प्रकृति का एकमात्र गुण उपादानत्व है अर्थात यदि कोई चेतन सत्ता इसके माध्यमसे कुछ बनाना चाहे, तो यह 'विकृत' हो सकती है। 'उद्देशपूर्ण, विकृतियों के क्रम' से सृष्टि बनती है।'' ''यह सृष्टि जीवमान के भोगोपभोग के लिए है। सृष्टि इसी प्रयोजन से बनायी जाती है। **परमात्मा की यह <u>कल्याणमय भावना</u> ही सृष्टि की रचना का प्रयोजन है।** सृष्टि रचना के प्रत्येक चरण मे जीवों के कल्याण की भावना विहीत है।''

आजच्या समाजावर भौतिक जीवन दृष्टी व भौतिक विज्ञान व तत्वज्ञान ह्यांची भयानक मगरमिठी आहे. तसेच वरील पद्धतीने सांगितलेला सृष्टीक्रम व प्रेरणा किंवा दिशा ह्यामध्ये <u>**'ईश्वरी चेतना शक्ती' ही काही जीवन उद्दिष्टे घालून देते - बीज संकल्पनेतून - व त्या बरहुकूम विकासाची दिशा व हेतू स्पष्ट होतो**</u> - हे त्यांना म्हणजे भौतिकवाद्यांना अमान्य असते!! पण, त्याखेरीज त्यांच्या तर्कपद्धतीत, मग कोणती धारणा मुख्य आहे व त्यांना ती ''नैसर्गिक'' व 'दोषमुक्त' कां वाटते? त्याचा खुलासा <u>**डॉ. सत्यप्रकाश सरस्वती**</u> <u>विस्ताराने करतात.</u> <u>लक्षात घ्या हे</u> <u>**गृहस्थ डॉक्टरेट इन सायन्स व अलाहाबाद युनिव्हर्सिटीमध्ये केमिस्ट्री डिपार्टमेंटचे हेड ऑफ दि डिपार्टमेंट होते. त्यांचे रसायनशास्त्रांत विस्तृत संशोधन झाले आहे.**</u>

त्यामुळे भौतिक विज्ञानशास्त्रांशी त्यांचा परिचय नव्हता, असे बिलकुल म्हणता येणार नाही. तरी देखील <u>त्यांच्या म्हणजे भौतिकवादींच्या सृष्टि दर्शनावर व ईश्वरी</u> हेतू बद्दल अविश्वास कां असावा? ती 'तर्कपद्धती' आपण पाहू या.

मूळ हिंदीतील लिखाण ते मी सोप्या मराठीत भाषांतर करून सांगतो आहे.

**भौतिकवादी विज्ञानाची गृहीते Assumtions :**

**नास्तिकांच्या भौतिक विज्ञानवादाच्या बाजूची तर्कपद्धती व गृहीते :-**

**(Atheist side of Logic and Assumptions)**

१) इंद्रियातीत जे दर्शन घडेल ते पूर्णपणे अविश्वासनीय व संशयास्पद मानावे!! (सरसकट!!)

२) सर्वज्ञ, सर्वव्यापक, सर्व शक्तिमान प्रभू (ईश्वर) ही एक 'मानवनिर्मीत कल्पना' आहे - सत्य नव्हे!! म्हणून त्याज्य आहे!!

(मात्र मानवनिर्मीत भौतिक विज्ञान हे मात्र पूर्ण वा अपूर्ण सत्य आहे. त्याची प्रगती होते आहे व अंतिम सत्य ह्याच मार्गाने मिळेल!!)

३) जे काही इथे अस्त्विात आहे ते 'क्षणभंगुर आहे' व परिवर्तनशील आहे-म्हणून 'सत्य नाही' (अंतिमसत्य नाही) व उलट ब्रह्मांड हे अविनाशी, अक्षर (न नाश पावणारे) व अपरिवर्तनीय (कधीही न बदलणारे आहें) आहे-असे मानणे ह्याला <u>**'पुरावा काय'**</u>? (पुराव्याची व्याख्या व प्रमाण ही सुद्धा फरक भौतिक विज्ञान पुरवते आणि तीच 'सत्यचांचणी' होय नाही कां?

४) ह्या पृथ्वीवर व अवकाशात व सृष्टित जे घडते, विकास पावते ते <u>'नैसर्गिक आहे.'</u> ते स्वयंभू व यांत्रिक आहे त्या नियमांचा कोणी 'स्वायिता नाही' तो स्वयंभू आहे. त्याला स्वतःची स्वनिर्मितीची इच्छाशक्ती नाही. उलर ते Mechanical आहे- यंत्रवत आहे. त्याकरिता 'चेतन शक्ति' ची आवश्यकता नाही-विचार <u>शक्तीची,</u>

ईच्छाशक्तीची व परम अक्षर शक्तीची सुद्धा आवश्यकता नाही.

५) जड पदार्थापासून चेतना निर्माण होते. 'जडापज्ञसून वेगळी भिन्न अशी 'चेतनाशक्ती' नाही.

६) निसर्गामध्ये भरपूर मूर्खपणा व विचार शुन्यता आहे, व तो आतांचा सद्य भौतिकवादी मानव दुरूस्त करण्याचा 'क्षमतेचा' आहे. जर कोणी ह्या सृष्टीचा निर्माता असेल-जर असावाच लागेल,- तर तो अज्ञानी व मूर्ख, अन्यायी व अविचारी आहे. त्यामुळे आम्ही (मर्त्य मानव) ' ह्या निसर्ग नियमात दुरुस्त्या' करत आहोत त्यांत आम्हाला अपूर्व यश मिळते आहे-व अंतिम यशाची आम्हाला खात्री आहे!! (विश्वास आहे-श्रद्धा आहे.)

७) विकासाची श्रृंखला ही जड व चेतन दोन्ही प्रकारांत पूर्णपणे समजली जाऊ शकते. त्यामुळे 'ईश्वर' ह्या संकल्पनेची अजिबात गरज नाही व ती खोटी आहे. (डॉ. श्रीराम लागू ह्यांचे तर म्हणणे आहे कीं (ईश्वर असेलच तर त्याला रिटायर करा!!) त्यामुळे ईश्वर, धर्म व परम विश्वसत्ताधीश व विश्वनिर्माता ह्या कल्पना चूक आहेत. ह्या अंधविश्वासाच्या आहेत.

८) जर ह्या 'संसार'-सृष्टित दुःख, रोग, 'जरा', मृत्यू आणि अनेक पीडा अंर्तभूत आहेत, तर ह्यावर कसा विश्वास ठेवावा कीं ह्याचा निर्माता आनंद स्वरूप व सूख देणारा आहे. (गौतम बुद्धाच्या मते तर हे जग दुःखस्वरूप, दुःखमय आहे. त्यामुळेंच विज्ञानवादी कम्यूनिस्टांना बौद्धवादी अत्यंत प्रिय आहेत.)पण, संपूर्ण बुद्ध तत्वज्ञान ह्यात ईश्वरतत्व अमान्य असले तरी तेही पूर्ण भौतिकवादी-विज्ञानवादी नाही हे ते विसरतात!! जवळ जवळ ह्याच्या पद्धतीची धारणा फार काळापासून अनेक शास्त्रे व संप्रदायांत आहे व कदाचित ती तशीच चालू रहाणार, स्वतःचे अपूर्णत्व मान्य करूनही!!

हे वरील वर्णन जरी मूळ स्वरूपांत डॉ. सत्यप्रकाश सरस्वती ह्यांनी मांडले तरी त्याचे थोडे रूपांतर करून मी थोड्याशा स्पष्टीकरणाच्या उद्दिष्टाने त्यांत माझे भाष्य घालून विस्तारले आहे, हे नमूद करतो.

कां हा खटाटोप करावयाचा?

**आधुनिक राजसत्तेची धारणा :**

ह्याचे मुख्य कारण असे, कीं जागतिक सर्वसाधारण संस्कृतीमधील मुख्य धारणा जवळजवळ ह्या स्वरूपाची आहे.

ह्या जगातील निरनिराळ्या देशांतील राजकीय सत्ता ह्या तात्विक भौतिकवादी, निधर्मी भूमिकेशी बांधलेली आहे. त्या देशांतील जनता मात्र संपूर्णपणे ह्या भूमिकेला जखडलेली नाही. पण, राजसत्तेला जो समाज नियंत्रणाचा अधिकार आहे व ती सुद्धा हीच जनता बहाल करते किंवा त्याचा वापर बळाचा व जुलमाच्या पोलिसी सामर्थ्याने केलेला हतबळपणे मान्य करते, ती सत्ता, आपल्या विचारांचा पगडा शिक्षणसंस्था, आर्थिक सत्ता, न्यायव्यवस्था ह्या यंत्रणेमार्फत राज्यघटनेच्या मार्फत, लोकशाहीच्या (Number Game) तथाकथित स्वातंत्र्याच्या मार्फत सर्वसाधारण 'Gullible' भोळसट जनतेवर लादत असते. थोडा सूक्ष्म विचार केला कीं ही राजसत्ता ऋषीतूल्य नैतिकतेची नसून ही बळीराजाच्या नैतिकतेची आहे व बलात्कारी आहे, हे लक्षात येईल.

**आधुनिक जगाची भाषा :**

याचा अर्थ असा नव्हे की, ह्याही प्रसंगात नवीन विचारांचा उद्भव होत नसतो. पण, तो अल्पमतात असल्याने, त्याला पूर्ण सामर्थ्य प्राप्त नसते व म्हणूनच त्याचा खरा प्रभाव ह्या अज्ञानी पण जुलमी राजसत्तेवर पडत नाही.

म्हणूनच, अशा कांही विचारांची आपण दखल घेणार आहोत. हे विचार युरोपांतील कांही पाश्चात्य विव्दानांचे आहेत. कां बरे आपण त्यांचा विचार

वाचावयाचा किंवा त्यांचा परिचय करून घ्यावयाचा?

ह्याचे मुख्य कारण हे कीं त्यांची भाषा (Human Language) मानवी भाषा कालानुरुप आपल्याही म्हणजे ह्या युगांत जन्माला आलेल्या मानवी जीवांच्या भाषेशी जुळती मिळती आहे. भाषेच्या माध्यमात ज्या संकल्पना (Memes) वापरल्या जातात त्यांच्याची आपला अनुभव व जीवसंबंध नैसर्गिक रीत्या जडलेला आहे. त्यामुळे तसा विचारांना व तर्कपद्धतींना आपल्या बुद्धीमध्ये प्रवेश आहे. Reception स्वागत आहे!! पण, जे ईश्वर निश्वसित वैदिक संहितेतील ज्ञान आहे. ते आपल्या भाषेत वा तर्कपद्धतीत चपखल बसणारे नाही. त्यामुळे ते सुलभ, सुबोध अवस्थेत नाही. त्यामुळे ते जरी सत्य दर्शन देत असेल. तरी ते आपल्याला समजत नाही ते ज्ञान ईश्वर निश्वसित आहे असे आपले ऋषी सांगत आहेत. हे ऋषी आपले खरे 'आत्प' आहेत. सध्याचे राजकारणी, समाजधुरीण शिक्षक विचारवंत, वैज्ञानिक, न्यायाधीश, सरकारी, समाजधुरीण शिक्षक विचारवंत, वैज्ञानिक, न्यायधीश, सरकारी अधिकारी, पोलीस, सैन्याधिकारी कितीही श्रेष्ठ असले तरी ते 'ऋषीतुल्य' नाहीत हे विदारक सत्य आहे. ते आपले आत्प नाहीत व पूर्ण ज्ञानीसुद्धा नाहीत!!

नुकत्याच घडलेल्या पार्लमेंट मधील Cash Gate नोटांचा प्रलयकारी प्रत्यय आपल्यासमोर आहे. त्यामुळे मानवी दुर्गूण व दोष यावर मात केलेल्या व्यक्ती निर्दोष कायदेकानू करण्याच्या योग्यतेचे व क्षमतेचे नाहीत हे उघड आहे!!

**New Biology**

डार्विनचा उत्क्रांतिवाद हा आज शाळा कॉलेजांमध्ये शिकविला जातो. जीवशास्त्रांत (Biology) तो सिंद्धांत म्हणून स्थान पटकावून बसला आहे.

ह्या सिद्धांताप्रमाणे जीवसृष्टीमध्ये जबरदस्त चुरस व संघर्ष आहे व त्यामध्ये जे यशस्वी ठरतात ते जगतात व शिल्लक रहातात.

पण, ह्या जगात बराच काळ दृढस्थान मिळवलेल्या सिद्धांताला पुष्कळ आव्हाने आली आणि त्या सिद्धातांतील न्यूनता दाखविण्यात आली.

आता New Biology नूतन जीवशास्त्रामध्ये पृथ्वीवरील जीवसृष्टीच्या उत्क्रांतीचा मार्ग हा वरवर संघर्षाचा वाटला तरी तो तसा नसून, जीवा जीवांमध्ये, जीव व प्रकृतीमध्ये परस्पर सहकार्य व देवाण घेवाण होत होत हल्ली ज्या पद्धतीला नेट वर्कींग म्हणतात. 'Net working', त्याप्रमाणे जीवनात जीवांची प्रगती व उत्क्रांती होत जाते असा आहे.



**Maturana**

Maturana and Varela ह्यांनी १९७२ मध्ये Autopoiesis ही संकल्पना मांडली. Auto (self) म्हणजे स्वयंचलित. Poiesis म्हणजे Creation, Production सृजन, निर्मिती. हे दोन्ही ग्रीक शब्द आहेत.

''When we Speak of living beings, we presuppose something in common between them--- Our Proposition is that living beings are characterised in that, literally, they are continually self-producing. We indicate this process when we call the organisation that



**Mr. Francisco Varela**

defines them an "Autopoietic System". The most striking feature of **an autopoietic system is that it pulls itself up by its own bootstraps and becomes distinct from its enviornment through its own dynamics in such a way that both things are inseparable.''**

To see and grasp the unity of life is the ultimate drive of any spiritual endeavour.

For this reason, spiritual resists Darwinian Biology, where evolution is considered as chronic, bloody competition (struggle for survival) among individuals and species.''

**इथे भगवद्‌गीतेतील ६ व्या अध्यायातील श्लोकाची आठवण होते.**

**''उद्धरेदात्मना ऽऽत्मानं नामात्मानमवसादयेत।**

**आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मै व रिपुरात्मना।।५।।**

**लो. टिळकांनी केलेले भाषांतर असे आहे.**

**(५) (मनुष्याने) आपण होऊन आपला उद्धार करावा. आपण आपल्या स्वत:ला (कधीही) खचवूं नये. कारण (प्रत्येक मनुष्य) आपणच आपल्या स्वत:चा बंधु (म्हणजे मदत करणारा) किंवा आपणच शत्रु म्हटला आहे.''**

**पुढे :-**

**बंधुरात्मा ऽऽमनस्तस्य येनात्मैवात्मना जित:।**

**अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत्।।६।।**

**(६) ज्याने आपणच आपल्याला जिंकिले तो आपल्या स्वत:चा बंधु होतो; पण जो आपल्याला ओळखत नाही त्याचें तो स्वत:च शत्रुप्रमाणे वैर करतो.''**

**महत्वाचा मुद्दा हा आहे कीं जर आपला आपणच उद्धार व प्रगती करावयाची तर त्यांची संकल्पना, योजना बाहेर कुठे नसून ती आपल्या स्वत:मध्येच आहे. बीज स्वरूपात आहे!!**

म्हणजे मानवी शरीर, बुद्धी, इंद्रिय, मन, अहंकार, गुण, प्रवृती त्यातील उघड व सूत्प शक्ती ह्यांचा जो गूढ रूपसंगम प्रत्येक माणसात आहे हा त्याला **जन्मसिद्ध** प्राप्त झालेला आहे. कां व कोणी असा घडवला, निर्माण केला ते माहीत नाही. आणि त्याचे बहीर्गत दिसणारे जड स्वरूप म्हणजे जे शरीर ते तर नशिवंत आहे. मग ह्या उत्कर्षाचे समीकरण, शक्ती, व संकल्पना ह्या बीजरूपाने विश्वाच्या अव्यक्त स्वरूपांतच रचल्या जात असणार!!

**Rupert Sheldrake** ह्या पाश्चात्य वैज्ञानिकाला हा प्रश्न अत्यंत तीव्रतेने जाणवला. त्याचे **New Science of Life** हे पुस्तक व त्यातील **Morphic Resoncance** ही थिअरी गाजली. हा एक ब्रिटीश बायॉलाजिस्ट व त्याच्या मताप्रमाणे जीवसृष्टीमध्ये जी जी 'रुपे', 'आकार' शरीराने दर्शविला जातो, तो युगानुयुगे टिकतो. कसा? त्यांत जर काळामध्ये काही बदल झाले तर त्या रूपामध्ये ते बदल कसे नोंद घेतले जातात. कित्येक शतकानंतरही हे बदल कसे संभाळले जातात. एका प्राण्यावर संस्कार करून जर बदल आता किंवा त्याच्या अनुभवात जर भर पडली तर ती त्याच जातीच्या इतर प्राण्यांवर ह्या बदलाची पूर्वस्मृतीची



**Mr. Rupert Sheldrake**

अनुभूती दृग्गोचर होते. **Ioo Monkey Priniciple** ह्या तत्वात एका माकडाने बायसिकल चालवण्याचे शिक्षण 'आत्मसात' केले कीं इतर माकडांना त्यात सहजता प्राप्त होते. हे कसे? पण, भौतिकवादी वैज्ञानिकांनी 'पुरावा कुठे आहे - Hard Facts कुठे आहेत असा हल्ला करून त्याला एक Magician जादूगार असेल पण वैज्ञानिक नव्हे असा गदारोळ केला. पण, मुद्दा शिल्लक रहातो कीं अव्यक्त जगात जे रेकॉर्ड असते तिथले बदल, तिथली समीकरणे ही वैज्ञानिकांच्या आवाक्याबाहेरच रहातात. त्यामुळे त्यांचा पूर्वग्रह व सत्याची कल्पना ही दूषित व अपूर्णच रहाते. हा त्यांचा हट्ट हा भौतिकवादी विज्ञानाच्या सीमा विस्तारित करत नाही. हा इतिहास जुनाच आहे. पण महत्वाचा प्रश्न आहे कीं हे प्रश्न पडले आहेत, पडणार आहेत व त्यांची ठाम उत्तरे मिळत नाही आहेत. मग एका Metholology मध्ये मिळत नसतील तर ती दुसऱ्या शास्त्रात हाताळायाला हरकत नसावी. पण, भौतिकवाद्यांची मगरमिठी मानवी समाजावर भरभक्कम झाली आहे. तिला राजकीय, सामाजिक, आर्थिक सत्ता गाजवणारे पुढारी, विचारवंत खतपाणी घालून ज्ञानाच्या खऱ्या प्रवाहाला अडथळा आणतात. कारण, ते ज्ञानार्थी नसून अज्ञानी व संकुचित जीवनाचे व उपयुक्ततावादाचे अनुयायी असतात.

पण, पुन्हा एकदा आपल्या विषयाकडे वळू या. संस्कृतीची वाढ किंवा वृद्धी कशी होते, कां होते व तिचे मूलगामी शक्तीस्त्रोत कोणते? तसेच <u>भारतीय संस्कृती बाबत बोलावयाचे झाल्यास तिचे बीज कोणते व त्याच्याशी सुसंगत अशी संस्कृतीची धारणा व पथमार्ग कोणता?</u>



**Mr. Vladimir Dimitrov**

ह्या प्रश्नांची उकल करत असताना **Autapoiesis and Spirituality ह्याचे एक ऑस्ट्रेलियन विचारवंत Vladimir Dimitrov** हे कांही मूलभूत संकल्पना व धारणा सांगतात त्यावर विचार करणे आवश्यक ठरावे.

(या लेखाचा उत्तरार्ध नोव्हेंबर २००८ च्या अंकात)

**यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी, अग्यारी लेन, ठाणे.
Tel. 25368450
E mail;: yrsane@eth.net

*विचार करतात, पण कृती करत नाहीत अशी माणसे अपयशी ठरतात.*

# समस्यामुक्त समाजव्यवस्था?

समाजातील समस्या चिरंजीव आहेत. पण त्यांच्या तीव्रतेचे संदर्भ बदलत आहेत. याच विषयासंबंधातले हे चिंतन

औद्योगिक क्रान्तीनंतर जगभर एक नवी भोगवादी संस्कृती फोफावू लागली. आयुष्यात जे काही करायचे ते पैशासाठी आणि पैसे मिळाले तरच ते करायचे असे स्थूलमानाने तिचे स्वरुप आहे. पैसे पेरीत आपले काम करून घ्यायचे; पैसे फेकीतच मुलांचे शिक्षण करायचे आणि भीक देण्याच्या वृत्तीने कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींवर खर्च करायचा असे तिचे ओंगळवाणे स्वरूप लक्षात येते. बालकांना घडवायचे आणि वृद्धांचा सांभाळ करायचा तर त्यासाठी केवळ पैसे खर्च करण्यापेक्षा खूप काही अधिक आणि वेगळे करण्याची आवश्यकता असते. त्या बालकांना आणि त्या वृद्धांना पैशापेक्षादेखील कर्त्या पिढीचा आधार, प्रेम आणि आपुलकीच्या भावनेची गरज अधिक असते.

सहज कानापर्यंत आलेले हे दोन संवाद आणि त्यांतील घटना अंतर्मुख करायला लावणाऱ्या आहेत. ऐन दिवाळीच्या दिवसात पतीचे निधन झालेली उच्चभ्रू वर्गातील एक महिला आपल्या मैत्रिणीशी बोलते आहे; ''बरे जायचेच तर याने ऐन दिवाळीचेच दिवस निवडायचे होते का? अग, संबंध वर्षातील आमच्या कमाईचे हे दिवस असतात. दोघांच्याही ऑफिसात येणाऱ्या भेटवस्तू घरी आणून लावता, लावता आमचे वर्ष निघून जाते. आता लोक भेटायला येताहेत ते नुसते कोरडे सांत्वन करत परत जाताहेत!'' तिला पती निधनाच्या दु:खापेक्षा यंदाच्या दिवाळीत आपल्याला नवीन भेटवस्तू मिळणार नाहीत याचे दु:ख अधिक होते!

दुसऱ्या एका घटनेत माहिती तंत्रज्ञान क्षेत्रांत एकाच ठिकाणी काम करणाऱ्या दोन तरुण जीवांची जवळीक निर्माण झालेली असते. लग्नाच्या आणाभाका व्हायच्या आधी दोघेही एकमेकांना जाणून घेत भविष्याचा वेध घेताहेत. युवक अमेरिकेत नोकरीसाठी जाऊन शक्य झाले तर तिथेच स्थायिक होण्याचे आपले मनोगत व्यक्त करतो. युवतीचा प्रश्न ''What About your Appending Garbage?'' तिचा रोख आपल्या माता-पित्याकडे असल्याचे युवकाचे लक्षात येते. तो भांबावतो आणि युवतीबरोबरचा आपला संवाद तिथेच संपवतो! नव्या युगातील प्रतिनिधिक स्वरूपातील या खूप बोलक्या घटना आहेत असे मला वाटते. समाजापुढील जुन्या समस्या सोडविण्याच्या प्रक्रियेत नवीन कुठल्या समस्या कशा स्वरूपात आपल्या समोर येतील हे सांगता येत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. जोतिराव फुले, आगरकर, टिळक, म. गांधी, बाबा आमटे आदी अलीकडच्या काळातील अनेक लोकनेत्यांनी आपल्या समाजाला ग्रासणाऱ्या विविध समस्या सोडविण्यात आपापले आयुष्य खर्ची घातले. त्यातील किती समस्यांचे किती प्रमाणात निराकरण झाले हे शोधनिबंधांचे विषय होऊ शकतात. काही प्रश्न सुटल्यासारखे वाटत असले तर त्यातून या अशा नवीन समस्या निर्माण होत राहातात. पण म्हणून या समस्या सोडवायचा कोणी प्रयत्नच करायचा नसतो का?

या समाजसुधारकांना तुम्ही हे ''अशा प्रकारचे प्रश्न अशा प्रकारे सोडविण्याचे प्रयत्न करा'' असे कोणी सांगायला गेले नव्हते. ती त्यांची आंतरिक प्रेरणा होती. त्यांनी स्वत:च स्वत:वर करून घेतलेल्या संस्कारांची ती परिणती होती. त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे निदान त्या प्रश्नांची समाजाला जाणीव होत गेली. त्यांची तीव्रता काही

*जगाच्या दृष्टीने तुम्ही एक व्यक्ती असाल, पण एखाद्याच्या दृष्टीने तुम्ही अख्खं जगही असू शकता.*

प्रमाणात कमी होत गेली. त्यामुळेच ते स्वत:देखील इतिहासात अजरामर झाले. जिजामाता, शिवाजी महाराज, रामदास स्वामी आदिंनी राष्ट्रधर्म चेतविला तेव्हा आपली मोगलांच्या जोखडातून सुटका झाली. आपल्याच करंटेपणाने ते स्वातंत्र्य पुन्हा हिरावले गेले. नंतर झालेल्या लाखो लोकांच्या बलिदानामुळे म. गांधींच्या नेतृत्वाखाली ब्रिटीश साम्राज्याच्या जोखडातून आपली सुटका झाली. आज पुन्हा आधी वैचारिक आणि नंतर सर्वच क्षेत्रात आम्ही गुलाम होऊन राहणार की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. यातून भारतीय समाजाची कधी सुटका होणार आहे की नाही?

दरडोई राष्ट्रीय उत्पन्न वाढवीत समाजाला दारिद्र्यरेषेच्या वर आणण्याच्या प्रक्रियेत व्यक्तिगणिक नवीन संसार आणि घरटी उभी राहताहेत! त्यामुळे गृहनिर्मितीच्या क्षेत्रात नवनवे प्रश्न उभे राहताहेत. निराधार वृद्ध आणि पोरकी बालके यांची संख्या वाढत जाणार असल्याचे दिसते. मनाला भांबावणारे, समाज धुरीणांना आव्हान देणारे आणि सबंध समाजाला अंतर्मुख व्हायला लावणारे हे प्रश्न आहेत. त्यांना सामारे जात त्यांच्यावर मात करणारी सक्षम पिढी निर्माण करणे हाच त्यावरील एक प्रभावी मार्ग असणार आहे! नाही, जिजामाता, दादोजी, गांधीजी आपले कार्य संपलेले नाही. ते कधीच संपणार नाही. आपल्याला पुन:पुन्हा जन्म घेत राहायला लागणार आहे. गीतेने आपल्यापुढे हे मांडून किती बरे शतके लोटलीत?

**श्री. पुनम सिंगवी**
फ्लॉवर व्हॅली, इस्टन एक्सप्रेस हायवे,
नारळी पाडा, ठाणे ४०० ६०१
दूरध्वनी - ०२२-२५४७ ४११९
फॅक्स - ९३२३२९१८९०
email - punamsingavi@mtnl.net.in

●●●

(पृ. ११ वरून)

**युरोपची तोंड ओळख**

फ्रेंच लोक अत्यंत कलासक्त असून पॅरिस 'नाईट लाईफ' साठीही प्रसिद्ध आहे. येथील 'लिडो' हे थिएटर युरोपातील उत्तम थिएटर समजले जाते. गंमत म्हणजे लिडो शो पहायला जाणाऱ्यांसाठी 'ड्रेसकोड' आहे. पायात बूट घालावे लागतात. पूर्वीच्या बुरबोन पॅलेस ह्या इमारतीत सध्या फ्रान्सची नॅशनल असेंब्ली भरते. तिच्यामागे 'हॉटेल दि इनव्हॅलिडस्' च्या जवळ नेपोलियनच्या थडग्याचा सोनेरी घुमट दिसतो. ह्या घुमटाखाली हिरव्या रंगाच्या संगमरवरी चौथऱ्यावर अंजिरी रंगाच्या मार्बलच्या शवपेटिकेत सम्राट नेपोलियन चिरनिद्रा घेत आहे. मध्ये असलेल्या संगमरवरी वर्तुळात त्याच्या आयुष्यातील महत्त्वाच्या लढायांची नावे लिहिलेली असून त्याभोवतीचे बारा पुतळे म्हणजे त्याच्या बारा मोहिमांची प्रतीक आहेत.

चौदावा लुई या राजाला त्याच्या सैनिकांचे अत्यंत प्रेम होते. वयोवृद्ध होऊन किंवा युद्धात अपंग होऊन लढण्यास अपात्र बनलेल्या आपल्या सैनिकांसाठी त्याने एक वसतिगृह बांधले. हेच 'हॉटेल दि इनव्हलिडस्' आता येथे मिलीटरीची कार्यालये आहेत. नोत्रदाम हे पॅरिसचे सर्वांत भव्य कॅथेड्रल. ते बांधण्यास इ. व. ११६३ ते १३०५ इतका दीर्घ कालावधी लागला.

**सौ. सुनीता खरे**
बी - ५४, मेघदूत सोसा.
शहाजी रोज रोड, कोलडोंगरी,
अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००६९
दूरध्वनी - २६८२६६९४

●●●

(उत्तरार्ध नोव्हेंबरच्या अंकात)

# शाश्वत आनंद

कोणता आनंद शाश्वत आहे याबद्दल माणूस नेहमी शोध घेत असतो. या शाश्वत आनंदासंबंधी काही विचार - संपादक

कोणत्याही सजीव प्राण्याची निर्मिती झाली कीं त्यास त्याच्या शरीराचे पालन पोषन करण्यासाठी गरज निर्माण होत असते. म्हणजेच, सजीव प्राण्यांच्या निर्मितीबरोबरच गरजेचीही निर्मिती झालेली असते. कोणत्याही व्यक्तीस तुला कशाची गरज आहे का? असे विचारले तर ती व्यक्ती नाही असे म्हणणारच नाही. कारण प्रत्येक व्यक्तीला जीवन जगण्यासाठी कशाची ना कशाची गरज असतेच. 'आता मला कशाचीही गरज नाही. असे म्हणणारी व्यक्ती मिळणे कठीण आाहे. अगदी साधू, संत, फकीर यांना जरी विचारले तरी त्या व्यक्ती मला कशाचीही गरज नाही असे म्हणणार नाहीत. कारण त्यांनाही उदरनिर्वाह करण्यासाठी काही तरी आवश्यक असतेच. भूक लागल्यानंतर त्यांनाही दारोदारी फिरून भिक्षा मागावी लागतेच. ही त्यांची गरजच असते. परंतु साधू, संत, फकीर यांची गरज आणि सर्वसामान्य माणसांची गरज यामध्ये फरक असतो.

साधू, संत यांच्या गरजा मर्यादित असतात. अंगावर पुरेसे वस्त्र आणि दोन घास अन्न मिळवणे याच्या पलीकडे त्यांच्या गरजा नसतात. त्यांना एकवेळचे अन्न नाही मिळाले तरी ते कुरकुर करीत नाहीत. आहे त्या परिस्थितीत ते आनंदी असतात. ज्यावेळी ते दुसऱ्यासमोर भिक्षा मागतात त्या भिक्षेमध्येही त्यांची मृदुता दिसून येते. एखाद्या व्यक्तीने भिक्षा दिली नाही म्हणून ते वाईट वाटून घेत नाहीत किंवा दुसऱ्यांचे वाईट चिंतत नाहीत. परंतु सर्वसामान्य माणूस आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी वाईट मार्गही अवलंबतात. त्यांच्या दृष्टिकोनातून गरज भागणे महत्त्वाचे असते. चोरी, लूटमार, मारामारी करून साधन संपत्ती जमा करतात आणि त्या भौतिक साधनांद्वारे गरज पूर्ण करून आनंद मिळवण्याचा प्रयत्न करतात.

या ठिकाणी आनंदही दोन प्रकारचा दिसून येतो.

**१) परमेश्वर प्राप्तीचा आनंद :**

परमेश्वर प्राप्तीचा आनंद टिकणारा असतो. त्यामध्ये अखंडत्व असते. या पृथ्वीवर अनेक माणसे आहेत परंतु सर्वांना परमेश्वर प्राप्तीचा आनंद घेता आला नाही. संत ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम, शंकर यांनाच परमेश्वर प्राप्तीचा आनंद घेता आला. परमेश्वर प्राप्त करण्यासाठी तीन गोष्टीची आवश्यकता असते. त्या तीन गोष्टी पुढील प्रमाणे आहेत.

१. कर्म २. ज्ञान ३. भक्ती

**१. कर्म :** आपण आपल्या जीवनात जे काही कर्म करतो ते कर्म चांगलेच असायला हवे. त्यामध्ये प्रामाणिकपणा हवा. नियमांच्या अधीन राहून कार्य करावे. तसेच वेदामध्ये सांगितल्याप्रमाणेच यज्ञ करावा. वेदामध्ये जसे शब्द, उच्चार, असतील तसाच त्यांचा वापर करावा. वेदांत सांगितल्याप्रमाणे यज्ञ केला नाही तर परमेश्वर प्राप्त होत नाही. उलट पापच पदरी पडते.

**२. ज्ञान :** आज जगात अनेक प्रकारचे लोक असे आहेत. की, त्यांना परमेश्वर म्हणजे काय? हे माहितही नाही. परंतु, तो प्राप्त व्हावा म्हणून धावा करीत असतात. अशाने परमेश्वर प्राप्त होत नाही. जगात जेवढ्या ज्ञानशाखा आहेत त्या सर्वांचा सखोल अभ्यास करून परमेश्वराच्या लीन झाले पाहिजे. म्हणजेच परमेश्वराबद्दलचे सर्व ज्ञान प्राप्त झाल्यानंतर त्याची भक्ती करावी. आणि काम, क्रोध, लोभ, मत्सर, अहंकार सोडायला हवा.

(पृ. २२ वर)

*दोरीवर सापाचा भास होण्यापूर्वी साप नसतो. दोरीच्या ज्ञानानंतरही साप नसतो. तसा जीवन हा भास आहे.*

# न मागितलेली भीक, मागे लागलेले कुत्रे

*कर्ज वाटण्यासाठी बँका मागे लागतात. सामान्य माणसाचा पार अभिमन्यू करतात. असाच एक अनुभव - संपादक*

बँकेच्या नावाचा उल्लेख करणे संकेताला धरून होणार नाही, मात्र या क्ष बँकेच्या वारंवार येणाऱ्या फोन कॉल्सनी हैराण होण्याचा अनुभव मुद्दाम लिहावा असा आहे अर्थात, या स्वरूपाचा अनुभव मला एकट्यालाच आलेला आहे असे नाही. कालानुरूप बदलत जाणाऱ्या व्यवहारांनुसार बँका अशाही प्रकारे मागे लागतात.

हा लेख लिहिण्याचा जो हेतू आहे, तो मध्यमवर्गीय मानसिकता जाणवून देण्याचा आहे. ऋण काढून सण न करण्याचा संस्कार असलेला मध्यमवर्गीय माणूस काळाच्या रेट्यानुसार लोन काढू लागला, तथाकथित स्वप्ने पूर्ण करू लागला. पण गरजेपेक्षा जास्त पैसा नको, ही त्याची मानसिकता. पगाराशी बांधील असणारा माणूस या मानसिकतेमुळे अंथरूण पाहून पाय पसरणारा. हप्ते फेडले नाहीत, किंवा फेडू शकलो नाही तर बदनाम होऊ, या भीतीने हप्त्यांची गणिते करीत जगणे, ही त्याची सवय.

अशीच एक वस्तू खरेदी करायला गेलो, तेव्हा दुकानदाराने त्याचे विपणन कौशल्य पणाला लावीत, 'अमूक एक (क्ष) बँक तुम्हाला लोन देईल, फक्त हा फॉर्म भरा. पैसे इसीएस ने कट होत राहतील. कोणतेही टेन्शन नाही!' हे माझ्या गळी उतरवले. अर्थात, 'टेन्शन कायको लेता है' हे मुन्नाभाई छाप वाक्य मीच मला ऐकवले व फॉर्म भरला.

'टेन्शन फ्री' होत ती वस्तू मी विकत घेतली.

चार दोन महिन्यांच्या अंतराने एका बँकेच्या अमूक तमूकचा फोन. ''आपसे मिलना चाहते है सर, हमारी नयी स्कीम लाँच हो रही है !'' -- वगैरे. मला कळेचना याला माझा नंबर मिळाला कसा? नकार देत मी फोन कट केला, तेव्हा आठवलं, ही त्या दुकानदाराच्या वस्तूवाली बँक असणार. पाच दहा मिनिटात पुन्हा ''सर, आप सुन तो लो...'' असं म्हणत हृदय बंद पडेल इतकं माझं हृदय परिवर्तन चालवलं. तेव्हा माझ्या लक्षात आलं, लोन घ्यावं म्हणून हा/ ही आपल्या मागे लागलाय. माझा ठाम नकार!

आठ दहा दिवसांनी दुसरा फोन. या वेळेला 'भ्रमण करताना'. (म्हणजे भ्रमणध्वनीवर!) ''गुड आफ्टरनून सर, मैं पार्वती बोल रहीं हूँ क्ष बँकसे'' मी फोन तोडला (म्हणजे आपल्या भाषेत डिस्कनेक्ट केला) परत रिंग टोन... ''सर, आप कितने बजे मिलेंगे, हमारा प्रतिनिधी आपको मिलने आएगा...'' माझा ठाम नकार!

तरीही फोन येणं चालूच होतं. कधी पाच दिवसांनी तर कधी दहा, कधी लँड लाईनवर, तर कधी मोबाईलवर. शेवटी मी एकदा विचारलं, ''आप क्यों बार बार सता रहें है?'' ''सर हम सता नहीं रहें है, आप का भला सोच रहे है आप तो एस्टीमड (?) कस्टमर हो, रेग्युलर इंस्टालमेंटस दे रहे हो, हम मदत करना चाहते है आपकी'' लिहायचं असल्यामुळे मी थोडक्यात लिहिलं. पण प्रत्यक्षात पाल्हाळ लावत, शब्दांना मध, लोणी लावत माझी मदत करण्याची इच्छा बँक व्यक्त करत होती. ''सर, मनी इज नो प्रॉब्लम सर, हम दिलवा देते है लोन...'' मला प्रश्न पडला मला लोन हवं आहे की काय? ... पण विचार केला तेव्हा लक्षात आलं, आपल्याला लोन वगैरे काहीही नकोय लोन घेणं सोपं, पण फेडायचं कोणी? झक मारली आणि मी वस्तू घेतली असं वाटायला लागतं...!

दुकानदाराला गाठलं. म्हटलं ''बाबा, हे बँकेचं काय लचांड मागे लावलंस... ते बंद कर.'' तर तो म्हणाला, ''त्यांचं हे कामच आहे सर, तुम्ही नाही म्हणा... किंवा असं का करत नाही, घेऊन टाका लोन आणि ही नवीन कुकिंग रेंज घेऊन जा...''

मनात अर्थातच वाक्ये, प्रतिवाक्ये यांचा आवाज दणदणत होता. घेऊन टाका काय... हप्ते कोण भरणार... हप्ते फिटले नाही तर... आणि कुकिंग रेंज करायची आहे काय?... लोडशेडिंगच्या काळात... (एका बँकवाल्या

(पृ. २२ वर)

(पृ. २० वरून)

**शाश्वत आनंद**

**३. भक्ती :** भक्ती करताना मन शांत असावे. मनावर नियंत्रण असायला हवे. भक्ती करताना आपले मन सर्वकाळ परमेश्वराच्या सान्निध्यात असावे. ज्याप्रमाणे आपण परमेश्वराची भक्ती करतो. त्याचप्रमाणे गुरुचीही भक्ती करावी.

**२) भौतिक सुखांपासून मिळणारा आनंद :**

भौतिक सुखांपासून मिळणारा आनंद जास्त टिकाणारा नसतो. आज आहे तर उद्या नाही अशा स्वरूपात असतो. खरा आनंद कशात आहे हेच आज लोकाना समजत नाही. भौतिक साधनांचा वापर करून ते आनंद मिळवण्याचा नेहमी प्रयत्न करतात. परंतु अशा बाह्य साधनांद्वारे मिळणारा आनंद हा सुद्धा बाह्य आनंदच असतो. हे कित्येकांना समजत नाही. भौतिक साधनांचा उपभोग घेऊन आनंद प्राप्त करणे म्हणजे कानाला चष्मा लावून पहाणे होय. किंवा जाण्याचे ठिकाण माहीत नसतांना प्रवास करणे होय. अशाने परमेश्वर प्राप्त होत नाही. परमेश्वर प्राप्त करायचा असेल तर परमेश्वराबद्दलची आपली चेतना जागृत असायला हवी. या शरीरामध्ये काय आहे हे एखाद्या डॉक्टरला विचारले तर तो सांगेल की, शरीरात पेशी आहेत, हाडे आहेत, रक्त आहे इ. परंतु हाच प्रश्न एखाद्या भक्तास केल्यास तो सांगेल की, या शरीरा आत्मा आहे, चेतना आहे, परमेश्वराचे वास्तव्य आहे. अशाच प्रकारचे आनंदाचे आहे. भक्ती, जप, तप करून परमेश्वर प्राप्तीचा आनंद मिळवायचा की भौतिक साधनांच्या मागे लागून क्षणिक बाह्य स्वरूपाचा आनंद घ्यायचा हे प्रत्येकाने ठरवायला हवे.

**श्री. यशवंत माने**
ग्रंथालय विभाग, रुपारेल महाविद्यालय,
माटुंगा, मुंबई - ४०००१६.

●●●

(पृ. २१ वरून)

**न मागितलेली भीक, मागे लागलेले कुत्रे**

मित्राचा जुना सल्ला (१९७९) मनात आवाज करत होता)... अरे बिंधास्त हप्ते बुडवायचे...

प्रश्नांच्या चक्रव्यूहात मनाचा अभिमन्यू अडकवून घराकडे परतत होतो. तोच भ्रमणध्वनी भणभणला. लोकलच्या गर्दीत नंबर न पाहताच तो बँकेचा असेल म्हणून कट केला. दुसऱ्या दिवशी मित्र भेटल्यावर, अरे महत्त्वाचे कॉल्स तरी डिस्कनेक्ट करू नको. असे अजीजीने विनवायला लागला...

भीकही नको, पण कुत्रंही आवर असं त्या बँकवाल्यांना सांगावसं वाटायला लागलं. आता घरच्या पत्त्यावर चक्क कुरिअर, बँकेचे लव्हलेटर. सह्या करून पाठवा... हे आता फारच झालं. पैसा नको म्हणणारा माझ्यासारखा महाभाग आहे तरी कोण हे कोडं बँकेलाही पडलं असणार! फोन करून मोहात पडत नाहीस काय, आता फॉर्मच घे... बँकेने ते जाडजूड कुरिअर पाठवले होते.

मग मात्र मला राग आवरेचना. त्या बँकेत जायला वेळ कोणाकडे आहे बोंबलायला, असे बायकोला ऐकवत मी फॉर्मवरचा भ्रमणध्वनी क्रमांक फिरवला. पलीकडून काही प्रत्युत्तर येण्याआधीच मी मोडक्या तोडक्या हिंदी इंग्रजीत 'अब मैं पोलिसको कंपलेंट करनेवाला है' हे सूत्र असणारा दम भरला. पलीकडून, ''पर, सर यह तो आपका फायदा...'' मी दम भरतच राहिलो. रक्तदाब चांगलाच वाढला असणार.

मनात भीती होतीच, बँकच पोलिसांना पाठवणार नाही कशावरून...? पण नाही. सुदैवाने म्हणा की, योगायोगाने, परिणाम चांगला झाला! म्हणजे मला येणारे बँकेचे फोन बंद झाले! नाही तर 'हाय, मैं कमलेश बात कर रहाँ हूं, मैं अंकिता बोल रही हूँ' या बिनचेहऱ्याच्या व बिनओळखीच्या आवाजांमुळे मनोरुग्ण म्हणजे काय त्याची चांगलीच प्रचीती मला आली असती!!

**प्रा. मोहन पाठक,** (ठाणे)

# वामनराव मराठे - स्थितप्रज्ञ कार्यकर्ता

*ठाण्यातील श्री. वामनराव मराठे यांनी सप्टेंबर मध्ये ८२ व्या वर्षात पदार्पण केले. त्यानिमित्ताने श्री. सुरेंद्र लागू यांनी लिहिलेले, त्यांच्या कार्याचे मोठेपण अधोरेखित करणारे हे पत्र. दै. सन्मित्र व श्री. लागू यांच्या सौजन्याने दिशात देत आहोत - संपादक*

श्री. वामनराव मराठे यांस,

सप्रेम नमस्कार,

जीवेत् शरदः शतम्! आपण वयाची ८१ वर्षे पूर्ण करून ८२ व्या वर्षात पदार्पण करीत आहात आणि त्यानिमित्त आपले चिरंजीव सर्वश्री अजित व अभय आणि स्नुषा सौ. अनिता व अनुजा आपल्या विषयी वाटणाऱ्या कृतज्ञतेच्या आणि आपुलकीच्या भावनेतून १५ सप्टेंबर २००८ रोजी हा मंगल सोहळा साजरा करीत आहेत हे वाचून आनंद झाला, समाधान वाटले. या प्रसंगी उपस्थित राहण्याविषयी आपण केलेल्या निमंत्रणाबद्दल धन्यवाद! आयुष्यातील एक महत्वाचा टप्पा (Miles stone) आपण यशस्वीपणे पार केला आहे त्याबद्दल मन:पूर्वक अभिनंदन! आपणासारख्या बुजुर्ग, वयोवृद्ध, तपोवृद्ध आणि ज्ञानवृद्ध व्यक्तीच्या कृतज्ञता सोहळ्याला उपस्थित राहण्याची संधी मिळत आहे हे आमचे भाग्य समजतो.

आपण नातेवाईक म्हणून माझ्या जन्मापासूनच आपणाशी माझा संबंध आला असला तरी गेली चार दशके अनेक सामाजिक संस्थांमधून करीत असलेल्या विविधांगी कार्यामुळे, समाजातील एक सन्माननीय, प्रतिष्ठित आणि आदरणीय व्यक्ती म्हणून अधिक ओळख झाली आणि ओळखीचे रूपांतर दृढ परिचयात झाले.

आपल्या जीवनशैलीचं आणि प्रदीर्घ आयुष्याचं रहस्य काय? असं विचारल तर त्याच एका वाक्यात वर्णन करायच म्हटल्यास ''साधी रहाणी आणि उच्च विचारसरणी'' असंच कराव लागेल. वामनराव, आपण म्हणजे A man of Devotion, Dedication, Determination and Discipline असेही म्हणता येईल.

फुलपँट, पूर्ण बाह्यांचा मनगटापर्यंत अर्धबाह्या केलेला शर्ट, खिशाला पेन, खांद्यावर शबनम पिशवी, पायात चपला, प्रसंगी धोतर, पांढरी टोपी, पायाला सदैव भिंगरी, लगबगीची चाल, शिडशिडीत बांधा आणि सदैव कार्यमग्न असलेली व्यक्ती म्हणजे वामनराव. मृदू, मितभाषी, जुळवून घेण्याचा स्वभाव, समोरील व्यक्तीच्या भावना जपणारी, चिकाटीने, तळमळीने, निरलस सेवावृत्तीने कार्य करणारी, झोकून देऊन काम करणारी परंतु तितकीच आग्रही, आपल्या भूमिकेशी ठाम असलेली व्यक्ती म्हणूनही आपली ओळख आहे. त्याचबरोबर माऊलीचा भक्त, सामाजिक कार्यकर्ता, समाजसेवक, नगरसेवक, पंढरीचा वारकरी, यशस्वी व्यावसायिक आणि कुशल संघटक म्हणूनही जनसामान्यांत आपण सुपरिचित आहात. सुमारे चार दशके नागरिकांच्या विश्वासहार्यतेला आणि सचोटीला उतरलेल्या 'मे. वामन शंकर मराठे लि.' पेढीचे संस्थापक संचालक म्हणूनही आपला नावलौकिक आहे.



**श्री. वामनराव मराठे**

*सर्व काही गेल्यावर हातात उरते त्याला अनुभव म्हणतात.*

**वंदनीय :**

मॉरिशसच्या जागतिक मराठी साहित्य सम्मेलनाच्या वेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात विचार मांडताना पु. ल. देशपांडे म्हणाले होते की, ''आजच्या समाजात ज्यांचे पाय धरावे, ज्यांच्या पुढे नतमस्तक व्हावे आणि ज्यांचा आदर, सन्मान करावा असे पायच कुठे दिसत नाहीत, जो तो दुसऱ्यांचे पाय ओढताना दिसतो.''

परंतु आपले कार्यकर्तृत्व, आपल्या सारखा सद्‌विचारी, सदाचारी, सत्‌शील, सत्‌चारित्र असलेल्या व्यक्तीकडे पाहिले तर आजच्या जमान्यातदेखील आपणासारख्या आदरणीय आणि सन्माननीय व्यक्ती आहेत असे गौरवाने आणि अभिमानाने सांगता येईल. कै. लागू मास्तरांचे बाबतीत देखील असाच काहीसा अनुभव अनेकांना आला होता.

**स्थितप्रज्ञ :**

''जोडोनिया धन उत्तम वेव्हारे।
उदास विचारें वेंच करी॥

संत श्रेष्ठ तुकारामांच्या या वचनाप्रमाणे एक्याऐंशी वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीत समाजकारण, अर्थकारण, राजकारण, धर्मकारण अशा सारख्या विविध क्षेत्रात आपण भरीव कार्य केले आहे. मात्र योग्य वेळी त्यांतून आपण निवृत्ती घेतली. हे जरी असल तरी आपला मूळपिंड, स्वभाव, सात्विक, सरळमार्गी आणि बैठक आध्यात्माची.''

आधी प्रपंच करावा नेटका।
मग पहावे परमार्थ विवेका।

या समर्थ वचनानुसार दोघांचीही आपण उत्तम रीतीने सांगड घातलीत. प्रत्येक ठिकाणी काम करताना एक 'मिशन' म्हणून आपण कार्य केले आहे.

असे म्हणतात की 'चाळीशी ही तारुण्यातील वृद्धत्व आहे तर साठी वृद्धत्वातील तारुण्य आहे' साठी नंतर येणारा वाढदिवस ३९ वा, ३८ वा, ३७ वा अशा क्रमाने साजरा करावा म्हणजे दिवसेंदिवस आपण तरुण होत असल्याचं मानसिक समाधान आणि आनंद मिळतो. खरंतर, वाढदिवस म्हणजे सिंहावलोकनाचा, गतस्मृतींना उजाळा देऊन त्यानुसार कार्यप्रवणाचा दिवस. भारतीय संस्कृतीनुसार साठीनंतर हळूहळू कुटुंबाची जबाबदारी मुलांकडे सोपवून वानप्रस्थाश्रमाकडे जाण्याचा काळ तर पंचाहत्तरीनंतर पूर्णत्वाने संन्यासाश्रम स्वीकारण्याचा कालखंड. विद्यमान परिस्थितीत याचा लौकिक अर्थ न धरता आपल्या आवडीच्या क्षेत्रात मग ते सामाजिक असो, वा धार्मिक, अध्यात्मिक वा अन्य कोणतेही क्षेत्र असो, स्वत:ला झोकून देऊन कार्य करण्याचा काळ. आपण मात्र या दृष्टीने जीवनाची वाटचाल या आधीच सुरू केली आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ब्राह्मण सभा, सरस्वती विद्यालय, आळंदी येथील ज्ञानेश्वर मंदिर, ब्राह्मण परस्पर साहाय्यकारी पतपेढी, उपवन येथील गणपती देवस्थान या आणि अशा सारख्या अनेक सामाजिक संस्थांमधून पदाधिकारी म्हणून आपण कार्यभार सांभाळला असून प्रत्येक ठिकाणी स्वत:चा ठसा उमटवला आहे. आपणासारखी समाजात स्थान असलेली आणि मान्यवर, दबदबा असणारी व्यक्ती पदाधिकारी म्हणून असावी असे त्या त्या संस्थेतील प्रत्येक कार्यकर्त्याला वाटत असे, आपलं केवळ असणं इतरांना प्रेरणा आणि प्रोत्साहन देणार होतं हे मी स्वानुभवावरून नमूद करू इच्छितो. हे जरी असले तरी आपल्या अमृत महोत्सवी वर्षानंतर एकेका संस्थेमधून अत्यंत सन्मानाने, आदराने आणि जाणीवपूर्वक निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतलात आणि प्रत्यक्षात तो अमलातही आणलात. आजच्या खुर्चीच्या राजकारणात आपण केलेली कृती उल्लेखनीय आणि गौरवास्पद तर आहेच, परंतु ती अनुकरणीय आहे. आजच्या समाजव्यवस्थेत अशी माणसे केवळ अभावानेच मिळतील.

*पुस्तके वाचण्यासाठी नसतात, पचवण्यासाठी असतात.*

**ज्ञानदेव सेवा मंडळ :**

असे असले तरी ज्ञानदेव मंडळातील कार्य आपण एका मिशनने, ध्येयाने आणि विशिष्ट उद्देशाने आजही करीत आहात. संस्थेची प्रगती, तिचा सर्वांगीण विकास, अधिक लोकाभिमुखता आणि समृद्धी हा आपला ध्यास आणि जीवनलक्ष आहे. पस्तीस - चाळीस वर्षांपूर्वी पाचपाखाडी भागातील एक छोटीशी टेकाडवजा जमीन, माळरान आणि गावाबाहेर असलेल्या जागेचे आपण आणि आपले सहकारी मिळून अथक परिश्रमाने, चिकाटीने, जिद्दीने आणि नि:स्वार्थी वृत्तीने काम करून ज्ञानेदव मंदिराची उभारणी केल्याचे ठाणेकर मंडळीनी जवळून पाहिलं आहे, अनुभवलं आहे. अत्यंत आखीव, रेखीव, पवित्र आणि मंगल वास्तू म्हणून या मंदीराकडे ठाण्यातील मंडळी अभिमानाने आणि कौतुकाने बघतात. धार्मिक कार्याव्यतिरिक्त वैद्यकीय मदत, तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी अशा सारखे समाजोपयोगी, समाजसेवेचे अनेकविध उपक्रम ज्ञानदेव सेवा मंडळातर्फे राबविले जातात. या सर्वामागे आपला सिंहाचा आणि अतिशय महत्त्वाचा वाटा आहे किंबहुना ज्ञानदेव मंडळ म्हटलं म्हणजे वामनराव असं समीकरणच आहे.



**वारकऱ्यांमध्ये रमलेले श्री. वामनराव**

ठाणे भूषण, सावरकर प्रतिष्ठान पुरस्कार, आदर्श दापंत्य पुरस्कार या आणि अशासारखे अनेक पुरस्कार आयुष्यात आपणाला मिळाले, मान-सन्मान प्राप्त झाले परंतु स्थितप्रज्ञ वृत्तीने आपण त्यांचा स्वीकार केलात त्यांनी हुरळून गेला नाहीत आणि 'कार्यकर्त्यांची' भूमिका कधीच सोडली नाही. खरेतर आपणासारख्या निस्पृहपणे काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्याला पुरस्कार देऊन 'ठाणे भूषण' पुरस्काराचाच मान वाढला आहे अस म्हटल तर अतिशयोक्ती होणार नाही.

'निधी संकलन' ही तर आपली खासियत. हे काम अतिशय कठीण आणि जिकीरीचे. त्याकरता चिकाटी, जिद्द, प्रामाणिक प्रयत्न, गोड बोलणं आणि मुख्य म्हणजे 'पेशन्स' असणे अत्यंत गरजेचे असते. पण त्याच बरोबर ''आधी केले मग सांगितले'' या न्यायाने कृती असावी लागते; तरच तुम्ही इतरांकडे हक्काने झोळी पसरू शकता. सगळी सोंगं करता येतात परंतु पैशाचं सोंग आणता येत नाही. देणग्या मिळविणे हे सोपं काम नाही. अनेक सामाजिक संस्थाना आर्थिक सहाय्याचा हात आपण दिला आहे.

**वारकरी :**

माऊली हे आपलं दैवत. 'एक तरी ओवी अनुभवावी' या न्यायाने अनेक वेळा ज्ञानेश्वरी पठण आपण केले आहे. स्वहस्ताक्षरात लिहीलेली संपूर्ण ज्ञानेश्वरी हे माऊलीवरील निष्ठेचे, उत्कट प्रेमाचे प्रतीक आहे. पांडुरंगाच्या दर्शनासाठी अनेक वर्षे दिंडीबरोबर 'वारकरी' म्हणून केलेली पायी वारी आणि वारकऱ्यांची करीत असलेली वैद्यकीय मदत, सेवा अनेकांना आदर्शवत आणि प्रेरणा देणारी आहे.

आपल्या ८१ वर्षाच्या आयुष्याच्या प्रदीर्घ वाटचालीत आपल्या सहधर्मचारिणीचं - शीलाताईचं मोलाचं योगदान आहे. यशस्वी पुरुषाच्या कर्तृत्वामागे त्याच्या पत्नीचा मोलाचा वाटा असतो हा बोथट झालेला वाक्प्रचार असला तरी वस्तुस्थिती नाकारता येत नाही. किंबहुना आपण दोघेही कर्तृत्ववान असल्यामुळे

(पृ. ३८ वर)

# मोबाईल वापर की गैरवापर

*मोबाईल ही असून अडचण नसून खोळंबा अशी बाब आहे. आपल्या दैनंदिन जीवनातील या महत्त्वाच्या गोष्टीबाबत चार अनुभवाच्या, जीवनातील नित्याच्या या बाबी - संपादक*

''मोबाईलवरच्या अश्लील गप्पांनी पालकांची झोप उडवली.'' ह्या बातमीने पालकांची खरंच झोप उडवली होती. आजकाल असे अश्लील मेसेजेस सतत मोबाईलवर येतात आणि मोबाईलचा उपद्रव वाढू लागतो. बसमध्ये, ट्रेन, रस्त्यावर, नाटकात, सिनेमात कुठेही, केव्हाही आणि कोणीही मोबाईलवर जोरजोरात बोलायला लागले की रसभंग तरी होतो किंवा ते अयोग्य व शिष्टाचारासही योग्य नाही. परंतु हाच मोबाईल आपत्कालात तुम्ही सुखरूप असल्याचा निरोप देतो आणि जीव भांड्यात पडतो. एखादा जखमी रुग्ण पटकन मोबाईलवरून आपल्या डॉक्टरांशी संपर्क साधून स्वत:वर उपचार करून घेतो. तर संकटांची सूचना देऊन, सावध करणारा निरोप आपल्याला वरदान ठरतो आणि म्हणूनच, काही पथ्ये पाळली तर आधुनिक तंत्रज्ञान आपण सुखाने उपभोगू शकतो. अणूचा वापर बॉम्ब बनवण्यासाठी वा विस्फोटकांत केला गेला नाही तर तो एक अत्यंत प्रभावशाली असा शोध आहे. तसेच अग्नी हा अन्न शिजवायला मदत करतो, तसेच तो घरे जाळण्यासाठीही कारण ठरतो. म्हणूनच, आपण कोठल्याही तंत्रज्ञानाचा वा वस्तूचा वापर करताना आपला संयम व विवेकबुद्धी वापरणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने खालील पथ्ये जरूर पाळावीत.

❖ प्रतिष्ठेची बाब म्हणून मोबाईल वापरू नका.

❖ मोबाईल ही आवश्यक व अतिमहत्त्वाच्या कामांकरिता वापरण्याची गोष्ट आहे, हे मुलांवर ठसवताना पालकांनीही याची जाणीव ठेवावी.

❖ शाळेतील मुलांना शक्यतो मोबाईल देऊ नका; पण गरजच असेल तर तो देताना कमीत कमी सुविधा असलेला द्यावा. म्हणजे मुले तास न् तास मोबाईलवर बोलत रहाणार नाहीत. तसेच पालकांचेही आचरण असावे अन्यथा महत्त्वाचे निरोप आपणासच मिळत नाहीत किंवा देता येत नाहीत.

❖ आपत्काळात (उदा. बॉम्बस्फोट, अतिवृष्टी वगैरे) लाईन्स जाम होऊन आपले निरोपही अपण नीट देऊ शकत नाही. तेव्हा कमी बोलून मोबाईल बंद करावा.

❖ सभेत, मिटींगमध्ये, नाटक - सिनेमा, बस, ट्रेन व सार्वजनिक ठिकाणी आपले मोबाईलवरील बोलणे हे हळू आवाजात हवे व रिंगटोनही व्हायब्रेशनवर राहतील ह्याची दक्षता घ्यावी. रस्त्यावर, बसमध्ये मोठ मोठ्याने बोलणे हे शिष्टयंमत ठरत नाही. आपल्यामुळे दुसऱ्यांना त्रास होत आहे, याचे भान असावे. तसेच अशा मोठ्याने बोलण्यामुळे आपले संभाषण दुसऱ्यांना ऐकू जाते. ते बऱ्याचदा इतरांना हास्यास्पदही वाटते व त्याचा फायदा समाजकंटकही उठवू शकतात. हे लक्षात ठेवावे. शिवाय आपले व्यक्तिगत संभाषण इतरांना का ऐकवावे? हा विचारही करावा.

❖ सतत मोबाईलवर बोलणे व ऐकणे हे आरोग्यास घातक ठरते असे शोधही आता लागत आहेत. कानाचे दुखणे, बहिरेपणा किंवा ब्रेनकॅन्सर सारख्या गोष्टी होऊ शकतात. हे आता सिद्ध झाले आहे. मोबाईल हा तातडीच्या किंवा अत्यावश्यक निरोपांसाठीच असावा हे पक्के ठरवावे. परदेशांत मोबाईल हे अत्यंत जरुरीच्या, महत्त्वाच्या वेळेसच वापरतात.

*मोती मिळवायचे असतील तर सागराचा तळ गाठावा लागतो.*

❖ मोबाईलच्या चोऱ्या ही पोलीसांची नवी डोकेदुखी आहे. तेव्हा आपले मोबाईल सुरक्षित जागीच ठेवावेत. आपले सर्व नंबर एका दुसऱ्या डायरीतही लिहून ठेवावेत. मोबाईल सुरक्षितेसाठी आलेल्या नव्या स्कीमचा फायदा घ्यावा. उदा. आपल्या मोबाईलचा Serial No. नोंद करून ठेवावा. मोबाईल चोरीस गेल्यास हा Serial No. activate केल्यावर चोर पकडला जाऊ शकतो किंवा चोराला आपला मोबाईल वापरता येत नाही. (कंपनी हा Serial नंबर देते.)

❖ मोबाईलमध्ये नंबर स्टोअर केल्याने आपण नंबर पाठ करून लक्षात ठेवण्याचेही विसतर आहोत व आपली स्मरणशक्ती कमी करत आहोत हे ही लक्षात घ्यावे.

म्हणूनच, मोबाईल वापरावा पण मर्यादित व योग्य वेळीच वापरावा. मोटार चालवताना, स्कूटरवरून जाताना, रस्ता क्रॉस करताना बोलत राहिलो तर अपघात वाढतात. कुठलेही तंत्रज्ञान हे आपल्या विवेकावरच शाप किंवा वरदान ठरते. याचे भान जरूर ठेवावे.

**श्रीमती वेदवती हब्बु**

शैलजा बिल्डिंग,
धों. वि. देशपांडे मार्ग,
शिवाजी पार्क, दादर,
मुंबई - ४०००२२.

●●●

(पृ. ३९ वरुन)

**गंगाधर गोपाळ गाडगीळ**

- **नाटकं :**

वेड्याचा चौकोन (१९५२)

ज्योत्सना आणि ज्योती (१९६४)

बंडूकथा आणि फिरक्या (१९७६)

- **प्रवासवर्णने :**

गोपुरांच्या प्रदेशात (१९५२)

साता समुद्रापलिकडे (१९७९)

चीन एक अपूर्व अनुभव (१९९३)

नायगराचं नादब्रह्म (१९९४)

- **समीक्षा :**

खडक आणि पाणी (१९६०)

साहित्याचे मानदंड (१९६२)

पाण्यावरची अक्षरे (१९७९)

आजकालचे साहित्यिक (१९८०)

- **चरित्र / आत्मचरित्र :**

एका मुंगीचे महाभारत (साहित्य अकादमीकडून गौरव)
प्रारंभ

- **पुरस्कार :**

कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा 'जनस्थान' आणि इतर अनेक.

●●●

*दिशा संपर्क दूरध्वनी*
*२५४२६२७०*

# 'खरा शिक्षक दिन'

*५ सप्टें. आमच्या विद्या प्रसारक मंडळातर्फे शिक्षक दिन व पदवीदान समारंभ वेगळ्या पद्धतीने साजरा करण्याचा दिवस. या वर्षीच्या या कार्यक्रमावर आधारित हा वृत्तलेख - संपादक*

शुक्रवार, दिनांक ५ सप्टें. २००८ रोजी अर्थात शिक्षक दिनी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात पदव्युत्तर पदवीदान समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नायर इस्पितळाचे अधिष्ठाता डॉ. संजय ओक लाभले होते. कार्यक्रमाच्या रिवाजाप्रमाणे पदवीदान समारंभानंतर प्रमुख पाहुण्यांचे भाषण! ते झालं की कार्यक्रमाची सांगता.



**दीप प्रज्ज्वलन**

डॉ. संजय ओक यांची बोलण्याची पद्धत सर्वांनाच भावली. डॉक्टरांनी त्यांच्या भाषणात जीवनात यशस्वी होण्यासाठी लागणारी दहा सूत्रे सांगितली; आणि त्याला अनुभवाची जोड देऊन ती सुंदर रीतीने पटवूनही दिली. बारा विविध विषयांतील पदव्या संपादन केलेल्या डॉ. ओक यांनी सभागृहातील सर्वांनाच घड्याळाचा विसर पडायला लावला. प्रमुख पाहुण्यांचं भाषण एवढ्या लवकर का



**डॉ. संजय ओक यांचे स्वागत**

संपलं? अस वाटलं.

डॉ. ओक यांनी केलेल्या भाषणाचा सारांश असा -

**१) जबाबदारी (Responsibility) :**

स्वत:च्या जबाबदाऱ्या ओळखा, स्वत:च सामर्थ्य ओळखा. आपल्या आयुष्यातील घडणाऱ्या सर्व चांगल्या तसेच वाईट गोष्टींची जबाबदारी स्वत:च उचलायला शिकायला हवं; त्याचं खापर दुसऱ्यावर फोडणे योग्य नाही. आपल्या जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडण्याचा प्रत्येकाने प्रामाणिक प्रयत्न करायला हवा.

**२) स्वत:वर विश्वास ठेवा (Believe yourself):**

आत्मविश्वास माणसाचं फार मोठ बळ आहे. स्वत:वर पूर्ण विश्वास ठेवून मनाचा दृढ निश्चय करून आपल्या जीवनातील ध्येय गाठण्याचा प्रयत्न आपण निश्चितपणे करायला हवा.

*संकटे फक्त नुकसानच करतात असे नाही.*

**३) वादविवाद टाळा (Don't argue) :**

कुठल्याही मुद्द्यावर वादविवाद करणे टाळा. वादाने कधीच तोडगा निघत नाही. आवाज चढवून बोलणे टाळा, यामुळे तुमचा योग्य असणारा मुद्दासुद्धा समोरच्या व्यक्तीला पटणार नाही.

**४) वाचाभक्ती कमी, श्रवणभक्ती जास्त करा (Be a good listener) :**

देवाने जेव्हा माणसाच्या शरीराची रचना केली. तेव्हा त्याला एक जीभ आणि दोन कान दिले. याचाच अर्थ आपण जास्तीत जास्त ऐकलं पाहिजे असाच होतो. पण वास्तवात आपण याच्या अगदी विरूद्ध वागतो, ऐकतो कमी आणि बोलतो जास्त. डॉक्टरांनी पुढे सांगितल की, जीभेच वजन इतर अवयवांच्या वजनाच्या तुलनेत खूपच कमी आहे, तरीही हे सत्य आपण विसरू शकत नाही की No one can hold the tongue, म्हणून आपण जिभेवर नियंत्रण दोन प्रकारे १. बोलताना, २. जेवताना ठेवणे अतिशय महत्त्वाचे आहे.

**५) क्षमाशील व्हा (Forgive others) :**

लहान सहान गोष्टीमध्ये दुसऱ्याच्या चुका दाखवणे, प्रत्येकाने सोडून दिले पाहिजे. सतत चुका दाखवत रहाण्यापेक्षा त्या माफ करणे खूप मोठी गोष्ट आहे. दुसऱ्याची चूक दाखवणे सोपे आहे; पण समोरच्याने दाखवलेली आपली चूक स्वीकारून ती सुधारण्याची तयारी ठेवा. आपली चूक स्वीकारण्याचा मनाचा मोठेपणा सर्वांनीच दाखवला पाहिजे.

**६) धाडसी व्हा (Take risks) :**

आयुष्यात अनेक अडचणी, अडथळे येणार, की ते पार करण्यासाठी धाडसी वृत्ती अंगी बाणवणे आवश्यक आहे. धाडस करायची तयारी ठेवूनच आपल्या मार्गावर चालणे गरजेचे आहे. आपल्यातील आशेचा किरण जागृत ठेवणे महत्त्वाचे आहे.

**७) भीतीवर मात करा (Overcome fear) :**

लहानपणापासून प्रत्येक व्यक्तीला भय, भीती ही असतेच. शालेय काळातील गृहपाठाच्या भीतीपासून ते वृद्धापकाळातील मरणाच्या भयापर्यंत प्रत्येक टप्प्यावर वेगवेगळ्या भीतीने माणूस त्रस्त असतो. या भीतीला, भयाला मागे सारून, त्याची लक्ष्मणरेषा ओलांडून पलीकडे जाणे महत्त्वाचे आहे.

**८) स्वत:चे काम चोख करा (Mind your own business) :**

नेमकं हेच आपण करत नाही. स्वत:च्या कामाकडे लक्ष न देता, समोरचा काय करतो याकडे जास्त लक्ष देतो, आणि त्याला त्याचं काम नीट कर असा सल्लाही देतो.

आपण कुठलंही काम करताना अडचणी येणार, स्पर्धा असणार. त्या सर्वातून चोख काम करण्याची सवय अंगी बाणवणे महत्त्वाचे. स्पर्धेच्या या युगात दुसऱ्याशी स्पर्धा न करता ती स्वत:शीच करा, आणि जिंकण्यासाठी सातत्याने अभ्यासही करायला हवा, असं मत डॉक्टरांनी व्यक्त केल.

**९) मार्ग चालताना तो मधेच सोडून देऊ नका (Don't ever give up) :**

आपण चालत असलेला मार्ग अडथळ्यांनी काट्याकुट्यांनी भरलेला असणारच, म्हणून तो सोडून देण्याचा विचार कधीही करू नका. देव त्या रस्त्यावर तुम्हाला 'U turn' देणार आहे. यावर विश्वास ठेवा.

**१०) समूहाला बरोबर घेऊन प्रगतिपथावर चाला (Be a team man) :**

एखाद्या समूहाचा/विभागाचा प्रमुख म्हणून जेव्हा

(पृ.३१ वर)

# श्रीमती जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धा - २००८

*गीता पठण स्पर्धा हा आमच्या मंडळातर्फे घेतला जाणारा महत्त्वाचा कार्यक्रम. त्याचा वृत्तलेख सोबत देत आहोत - संपादक*

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे आयोजित श्रीमती जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धा दि. २१ सप्टेंबर २००८ रोजी डॉ. बेडेकर विद्या मंदिर येथे संपन्न झाली.

इ. ४ थी ते ९ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी एकंदर दोन गटांत ही स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत एकंदर ११६ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. यावर्षी स्पर्धेसाठी गीतेतील १४ वा अध्याय निश्चित करण्यात आला होता. परिक्षक म्हणून सौ. आनंदीबाई केशव जोशी इ. मि. स्कूल आणि डॉ. बेडेकर विद्या मंदिरचे काही शिक्षक तसेच ठाण्यातील काही गीताप्रेमी उपस्थित होते. सकाळी ९ ते ११.३० या वेळात मुख्य स्पर्धा पार पडल्यानंतर लगेचच पारितोषिक वितरण समारंभ पार पडला.

पारितोषिक वितरण समारंभात सर्वप्रथम काही स्पर्धकांनी १४ वा अध्यायाचे पठण केले. त्यानंतर मंडळाच्या सदस्या सौ. अल्पना बापट यांनी उपस्थितांचे स्वागत केले. मंडळाचे खजिनदार श्रीयुत मा.य. गोखले यांनी प्रास्ताविकात स्पर्धेविषयी माहिती सांगितली. गीताप्रेमी श्रीमती जानकीबाई गोखले या आपल्या मातोश्रींच्या स्मरणार्थ त्यांनी मंडळाकडे काही ठेव ठेवली आहे. त्यातून विद्या प्रसारक मंडळाच्या सहाय्याने दरवर्षी हा कार्यक्रम आयोजित केला जातो. गीतेविषयी बोलताना ते म्हणाले गीता जितक्या वेळा वाचावी तेवढी ती अधिक कळत जाते. लहान वयात पाठ करताना अर्थ कळला नाही तरी पुढील आयुष्यात खूप उपयोग होतो.

त्यानंतर श्री. मा.य. गोखले यांनी प्रमुख पाहुणे श्रीयुत शंकर पराष्टेकर यांचा पुष्पगुच्छ देऊन व परिक्षकांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार केला. परिक्षक प्रतिनिधी म्हणून श्रीमती मंदाताई बापट यांनी आपले विचार मांडले.

श्री. करंदीकरसर आणि श्री. मठसर या मान्यवरांनी स्पर्धक विद्यार्थ्यांचे कौतुक करून ही स्पर्धा उत्तरोत्तर यशस्वी व्हावी म्हणून शुभेच्छा दिल्या.

प्रमुख पाहुणे श्रीयुत शंकर पराष्टेकर यांनी आपल्या भाषणात इतक्या चांगल्या स्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले. तसेच गीता हा प्रमुख ज्ञानाचा विषय आहे. गीतेच्या अध्ययनाने मन खंबीर होते. उच्चारण शुद्धता प्राप्त होते असे सांगितले. ह्या स्पर्धेच्या आयोजकांनी गीता अध्ययनाची सोय करावी अशी सूचनाही केली. त्यानंतर विद्यार्थी ज्याची आतुरतेने वाट बघत होते त्या पारितोषिकांची सौ. अल्पना बापट यांनी घोषणा केली. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे होता -

**गट क्र. १ - इ. ४ थी, ५ वी, ६ वी**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | कृपाली जाधव | महाराष्ट्र विद्यालय |
| द्वितीय क्रमांक | अंकिता नाईक | सावित्रीबाई थिरानी विद्यामंदिर |
| तृतीय क्रमांक | मृणाल कर्णिक | सौ. ए. के. जोशी स्कूल |
| उत्तेजनार्थ | अदिती गोखले | सौ. ए. के. जोशी स्कूल |
| | रेवती तांबे | नानीक इंग्लिश स्कूल |

**गट क्र. २ - इ. ७ वी, ८ वी, ९ वी**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | गायत्री जोशी | सरस्वती सेकंडरी स्कूल |

| | | |
|---|---|---|
| द्वितीय | - नेहा पुसाळकर | - सौ. ए. के. जोशी स्कूल |
| तृतीय | - अक्षय जाधव | - डॉ. बेडेकर विद्या मंदिर |
| उत्तेजनार्थ | - मिहिर गाडगीळ | - डॉ. बेडेकर विद्या मंदिर |
| | निलम बोंगणे | - शेठ बबनराव पडवळ विद्यालय |

सौ. अल्पना बापट यांनी केलेल्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. पुढील वर्षासाठी दुसरा अध्याय निश्चित केल्याची घोषणा करण्यात आली.

**सौ. मैत्रेयी शेवडे**
आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा, ठाणे.

●●●

(पृ. २९ वरून)

**'खरा शिक्षक दिन'**

तुम्ही सूत्र सांभाळणार आहात, तेव्हा तुमच्या सहकाऱ्यांना तुमच्या बरोबर घेऊन चाला. प्रगतीकडे जाताना सहकारी मागे व रहाता बरोबर असणे खूप महत्त्वाचे आहे. प्रसंगी स्वत:कडे कमीपणा घेण्याची तयारी सुद्धा प्रमुखाला ठेवावीच लागते.

या दहा सूत्रांबरोबरच डॉ. ओक यांनी प्रत्येक व्यक्तीने कायम विद्यार्थी असल पाहिजे, नवनवीन शिकण्याची सतत तयारी ठेवली पाहिजे. तसच आयुष्यात घडून गेलेल्या वाईट गोष्टींकडे न बघता, चांगल्या गोष्टींचा विचार करून सतत पुढे जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे असेही मत व्यक्त केले. शिक्षकांना उद्देशून ते पुढे म्हणाले, 'A good teacher teaches, a great teacher inspires.' आपण सर्व great होण्याचा प्रयत्न करूया.



**डॉ. संजय ओक यांच्या हस्ते पदवी स्वीकारणारी विद्यार्थिनी**

डॉ. संजय ओक यांनी सांगितलेल्या दहा सूत्रांचा वापर आपल्या दैनंदिन जीवनात आपण केला तर आपण नक्की यशस्वी व्यक्ती होऊ यात शंकाच नाही. ४० मिनिटे सर्व श्रोते एकाग्र चिताने डॉक्टरांचे विचार ऐकण्यात गुंग झाले होते.

डॉक्टरांनी त्यांच्या या सुंदर भाषणाचा शेवट हिंदी भाषेतील चार ओळींनी केला -

सोच बदलो, सितारें बदल जायेंगे,
नजर बदलो, नजारे बदल जायेंगे,
क्यों बदलते हो, कश्तीयाँ बार बार?
दिशायें बदलो, किनारे बदल जायेंगे।

शिक्षक दिनी अशा उच्चविद्याविभूषित ज्ञानी तरीही अतिशय नम्र अशा शिक्षकाचे विचार आम्हांला ऐकायला मिळाले हे खरंच आमच भाग्य! याबद्दल आम्ही सर्व शिक्षक विद्या प्रसारक मंडळाचे शतश: आभारी आहोत. शिक्षकांना नुसतेच उपदेशाचे डोस पाजण्यापेक्षा माणूस म्हणून अंतर्मुख करायला लावणारे विचार डॉ. संजय ओक यांनी मांडले.

माझ्या मते हाच खऱ्या अर्थाने 'शिक्षक दिन.'

**सौ. प्रिती कुळकर्णी** (शिक्षिका)
सौ. ए.के.जोशी इंग्लीश मिडी. स्कूल,
पूर्व प्राथमिक विभाग

●●●

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.)

✦ **दूरदर्शन :**

सह्याद्री वाहिनीवरील 'दम-दमा-दम' या कार्यक्रमात इ. ८ ब मधील प्रिया टिपाले व इ. ८ क मधील चैताली पेंडसे या विद्यार्थीनी सहभागी झाल्या.

**कार्यशाळा :**

✦ **मातीकाम :**

गणेशोत्सवाचे औचित्य साधून शाडूच्या मातीचा गणपती बनवण्याची एक कार्यशाळा ९ ऑगस्ट रोजी घेण्यात आली. त्यासाठी रहेजा स्कूल ऑफ आर्टचे प्रा. नंदू साखरकर यांनी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा.वि.) व सौ. आनंदीबाई जोशी शाळेचे विद्यार्थी सहभागी झाले.

✦ **भूगोल :**

इ. ८ अ च्या विद्यार्थ्यांची भूगोल विषयाची कार्यशाळा सौ. आनंदीबाई जोशी विद्यालय येथे झाली. यामध्ये विद्यार्थ्यांना नकाशावाचन, नकाशा भरणे तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून भूगोलाचा अभ्यास कसा करता येईल; तसेच प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून चंद्रकला व ऋतुचक्र यासारख्या गोष्टींची माहिती विद्यार्थ्यांनी मिळवली.

**विविध स्पर्धांमधील यश :**

✦ 'संस्कृती कला दर्पण' तर्फे घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांत खालील विद्यार्थ्यांना पारितोषिके प्राप्त झाली.

**वक्तृत्व स्पर्धा :** निधी प्रभू (९ क) प्रथम क्रमांक

**गीतगायन :** मृणाली कराळे (९ क)

**रेकॉर्ड डान्स :** वेदांगी धारप (५ ब) द्वितीय क्रमांक

निधी प्रभू (९ क) द्वितीय क्रमांक

ईश्वरी निमकर (६ इ) उत्तेजनार्थ

**एकपात्री अभिनय स्पर्धा :** निधी प्रभू (९ क) प्रथम क्रमांक

✦ 'मराठा मंडळ, मुलुंड' आयोजित भव्य आंतरशालेय चित्रकला स्पर्धेत प्रसाद तिरोडकर (१० अ) यास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. पारितोषिक मानचिन्ह व रोख रु ५००/- या स्वरूपाचे आहे.

✦ १४ वर्षाखालील मुलींच्या पावसाळी खो-खो स्पर्धेत मुलींचा संघ उपविजयी ठरला.

**विशेष यश :**

✦ २००६-०७ मध्ये झालेल्या महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे व राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी घेतलेल्या प्रज्ञा शोध परीक्षेत इ. १० अ मधील अमेय गणमे यास शिष्यवृत्ती प्राप्त झाल्याबद्दल जिल्हा पालकमंत्री श्री. गणेशजी नाईक यांच्या शुभहस्ते १५ ऑगस्ट रोजी प्रशस्तिप्रत्रक देण्यात आले.

✦ ऐरोली स्पोर्टस् असोसिएशन तर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय जिमनॉस्टिक स्पर्धेत प्रीती टिपाले (६ अ) हिला वॉल्टिंग हॉर्स व फ्लोअर एक्ससाईज या दोन्ही क्रीडाप्रकारांत सुवर्णपदक प्राप्त झाले.

**प्रकाशन :**

✦ १५ ऑगस्ट रोजी विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष

मान. डॉ. श्री. विजय बेडेकर यांच्या शुभहस्ते इ. ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी तयार केलेली हस्तलिखिते व भित्तीपत्रिका तसेच शिक्षकांनी तयार केलेल्या दोन हस्तलिखितांचे प्रकाशन करण्यात आले.

**सेवाप्रकल्प :**

✦ श्रावणी सोमवार निमित्त कौपिनेश्वर मंदिर येथे इ. ८ वी च्या स्काउटस् व गाईडस् यांनी सेवाप्रकल्प राबविला.

✦ 'राजीव गांधी अक्षय उर्जा दिना' निमित्त निघालेल्या रॅलीत इ. ७ क चे स्काउटस् व गाईडस् सहभागी झाले.

**उपक्रम :**

✦ स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून १४ ऑगस्ट रोजी इ. १० ब व १० क या वर्गातील विद्यार्थ्यांची भाषा कौशल्ये वाढविण्यासाठी आयोजित केलेल्या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांची १. इंग्रजी संवाद क्षमता २. संवाद कौशल्ये ही भाषा कौशल्ये वाढविण्यासाठी उपमुख्याध्यापिका सौ. देशपांडे यांनी कार्यक्रम केला.

✦ हिंदू जागृती गणेशोत्सव मंडळ, ठाणे आयोजित 'अथर्वशीर्ष पठण' या कार्यक्रमात इ. ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी मिळून २०,१५२ आवर्तने करून श्री गणेशाजवळ आशीर्वाद मागितले.

**पथनाट्य :**

✦ पूजनीय कै. पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या स्वाध्याय परिवारातर्फे 'गोकुळाष्टमी'च्या निमित्ताने पथनाट्याचा कार्यक्रम इ. ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी सादर केला गेला.

आजच्या धकाधकीच्या जीवनात आणि झटपट श्रीमंत होण्याच्या ईर्षेने तरुण वर्गाची पावले चुकीच्या मार्गाने जाण्याची शक्यता कशी आहे, हे टाळण्यासाठी शिक्षण, व्यवसाय व चारित्र्य या सर्वांची सांगड घालणे कसे आवश्यक आहे. त्याद्वारे चारित्र्य जतन व चारित्र्य संवर्धनाचे महत्त्वही काय आहे हे सांगितले.

**श्रीकृष्ण जन्माष्टमी :**

✦ 'श्रीकृष्ण जन्माष्टमी' निमित्त २३ ऑगस्ट रोजी इ. ५ वी च्या विद्यार्थ्यांसाठी मान. मुख्याध्यापिका सौ. कळमकर यांनी शैक्षणिक दहीहंडीचे आयोजन केले. या समारंभाला सौ. नयना वैद्य उपस्थित होत्या. त्यांनी प्रत्येक अवताराचे महत्त्व सांगून श्रीकृष्ण अवताराचे महत्त्व स्पष्ट केले. श्रीकृष्णाच्या खोड्यांमागील हेतू हा दुष्टांचा संहार करण्याचा होता हे चातुर्य आज जपणे आवश्यक आहे.

✦ संस्कार भारती तर्फे जन्माष्टमीचे औचित्य साधून चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. त्यात ममता येरूणकर (१० ब) हिला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

✦ 'व्यासपीठ' या संस्थेतर्फे ९ ऑगस्ट रोजी 'गुणात्मक शैक्षणिक धोरण' या विषयावर श्री. एस्. व्ही. दामले यांचे व्याख्यान आयोजित केले होते. 'ISO हे आंतरराष्ट्रीय व्यवस्थापन मानक आहे.' त्याबद्दलची माहिती त्यांनी दिली.

✦ 'सुंदरम मल्टीपॅप लिमिटेड' यांच्यातर्फे श्री. भूपेश दवे यांनी एका अभिनव कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी प्रभावी अभ्यास करण्याची काही तंत्रे त्यांनी समजून सांगितली. या कार्यक्रमास श्री. शिरापुरी व श्री. खैरनार उपस्थित होते.

## सौ.आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा (मा. वि.)

✦ **खालील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय प्रज्ञा शोध शिष्यवृत्ती २००८ मिळाली :**

| | | |
|---|---|---|
| कु. वृषाली प्रसादे | - | इ. ८ वी |
| कु. ऋचा कारखानीस | - | इ. १० वी |

*कुणालाच आपल्यापेक्षा कमी लेखू नये.*

कु. ओजस गोहाड - इ. १० वी

**✦ गणित संबोध २००८ परीक्षेचा निकाल :**

| इयत्ता | ५ वी | ८ वी |
|---|---|---|
| विशेष श्रेणी | ६ | ० |
| प्रथम श्रेणी | २६ | ८ |
| द्वितीय श्रेणी | २२ | ३ |
| उत्तीर्ण | १२ | ५ |

**✦ सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे:**

| इयत्ता | नाव | गुण |
|---|---|---|
| इ. ५ वी | कु. चैतन्य केळकर | ९६ |
| इ. ५ वी | कु. नेहा केळकर | ९६ |
| इ. ५ वी | कु. निनाद मराठे | ९६ |
| इ. ८ वी | कु. प्राची जयस्वाल | ८८ |

**✦ नाट्यस्पर्धेचा निकाल :**

श्रीकला संस्कार, डोंबिवली या संस्थेतर्फे आयोजित नाट्यस्पर्धेत आमच्या शाळेने सादर केलेल्या 'झपूर्झा गडे झपूर्झा' या नाटकांस ५ वी ते १० वी या गटात द्वितीय परितोषिक मिळाले.

**✦ विज्ञान प्रदर्शन स्पर्धा :**

जिल्हा परिषदेने आयोजित केलेल्या 'राजीव गांधी अक्षय उर्जा दिवस' - विज्ञान प्रकल्प स्पर्धेत आमच्या शाळेला प्रथम पारितोषिक मिळाले. प्रकल्पाचा तपशील खालील प्रमाणे -

**विषय :** उर्जा बचत किंवा अपारंपरिक उर्जा स्त्रोत

**प्रकल्प :** Micro Hydro Power Plant ची प्रतिकृती

**सहभागी विद्यार्थ्यांची नावे :**

१) कु. अमित पाटणकर २) कु. मिहीर कुलकर्णी

## जोशी - बेडेकर महाविद्यालय

**दि. ११.०८.२००८ ते दि. १०.०९.२००८ या कालावधीत संपन्न झालेले कार्यक्रम :**

✦ दि. १४ ऑगस्ट रोजी इतिहास विभागातर्फे उद्घाटन सोहळा आयोजित करण्यात आला. या प्रसंगी डॉ. सोनाली पेडणेकर, इतिहास विभागप्रमुख, वझे-केळकर महाविद्यालय या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी इतिहास विषय घेऊन व्यवसायाच्या विविध उपलब्ध संधी या विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर 'शतरंज के खिलाडी' हा सिनेमा दाखविण्यात आला.

✦ दि. १५ ऑगस्ट रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व संस्थांचा एकत्रित स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. त्यानंतर 'दृक्श्राव्य कार्यशाळा' व पाणिनि सभागृहाचे उद्घाटन झाले.

✦ दि. १८ ऑगस्ट रोजी 'व्याससभा' या कार्यक्रमांतर्गत 'दहशतवाद उपाययोजना' या विषयावर प्राध्यापकांनी चर्चा केली.

✦ दि. २२ ऑगस्ट रोजी 'स्वातंत्र्योत्तर भारतीय साहित्य' या विषयावर १६ व १७ जानेवारी, २००९ रोजी संपन्न होणाऱ्या चर्चासत्रापूर्वीच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी व सध्याच्या पेढांरकर महाविद्यालय, डोंबिवली, येथील प्राचार्या डॉ. मंगला सिन्नरकर या उद्घाटक व सत्राध्यक्ष म्हणून लाभल्या होत्या. दुसऱ्या सत्राचे अध्यक्षपद प्रा. श्री. दामोदर मोरे, मराठी विभागप्रमुख, जोशी-बेडेकर महाविद्यालय, यांनी स्वीकारले. तिसऱ्या सत्रासाठी अध्यक्ष म्हणून डॉ. बी. रंगराव अधिव्याख्यात, इंग्रजी विभाग, मुंबई विद्यापीठ लाभले होते. एकूण १२ शोधनिबंधाचे वाचन या

कार्यशाळेत झाले. महाविद्यालयात तसेच अन्य महाविद्यालयात कार्यरत असणाऱ्या संस्कृत, मराठी, हिंदी व इंग्रजी विषयाच्या प्राध्यापकांचा शोधनिबंध वाचनात सहभाग होता.

✦ दि. २३ ऑगस्ट रोजी जोशी-बेडेकर फिल्म सोसायटी तर्फे 'GIE' हा चित्रपट दाखविण्यात आला.

✦ दि. २३ ऑगस्ट रोजी भूगोल विभागातर्फे एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ही कार्यशाळा 'NIIT - GIS Ltd' तर्फे घेण्यात आली. या प्रसंगी श्री. प्रीतम कार्वी, श्री. वत्सल दवे व श्री. कृणाल पटेल यांची 'GIS' या विषयावर व्याख्याने झाली.

✦ दि. २७ ऑगस्ट रोजी 'निसर्ग मंडळा'तर्फे 'इको-फ्रेंडली गणपती' या विषयावर पथनाट्य झाले.

✦ दि. २८ ऑगस्ट रोजी सांख्यिकी व गणित विभागातर्फे श्री. अभिजित काळे व श्री. कौस्तुभ काळे, माहिती -तंत्रज्ञान विभाग, बांदोडकर महाविद्यालय, यांचे 'Open sources' या विषयावर व्याख्यान झाले.

✦ दि. ०१ सप्टें. रोजी 'Student's Council'तर्फे सत्यनारायण पूजेचे आयोजन करण्यात आले होते.

✦ दि. ०६ सप्टें. रोजी 'व्याससभा' कार्यक्रमांतर्गत प्रा. श्री. मुर्डेश्वर, समन्वयक, बी.एम्.एस् विभाग, यांचे 'The Sale of Goods Act 1930' या विषयावर व्याख्यान झाले.

✦ दि. ०९ सप्टें. रोजी 'विवेकानन्द केन्द्र' ठाणे यांच्यातर्फे 'विजय, पूर्ण विजय' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी श्रीमती आशाताई रानडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

✦ दि. ०९ सप्टें. रोजी वाणिज्य विभागातर्फे प्रथम वर्ष, वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी 'Case studies' या विषयावर व्याख्यान झाले.

✦ दि. १० सप्टें. रोजी 'स्कॉलर्स अॅकॅडमी' तर्फे 'Art : Giving Form to Life' या विषयावर चर्चा आयोजित करण्यात आली. सर्व प्राध्यापकांचा यात सहभाग होता.

**वृत्तसंकलन :** प्रा. मुग्धा कुलकर्णी
जोशी-बेडेकर महाविद्यालय

## डॉ. व्ही. एन. बेडेकर व्यवस्थापन अभ्याससंस्था

''The Wonder of Dabbawalla's Unfold''

दि. १३ सप्टेंबर २००८ रोजी व्यवस्थापन अभ्यास संस्थेतर्फे 'The Wonder of Dabawalla's Unfold' या विषयावर डॉ. पवन अग्रवाल (CE - Nutan Mumbai Tiffin Box supplier Charitable Trust) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. मुंबई डब्बावाला संघटनेच्या विस्मयकारक व्यवस्थापन कौशल्याचे कथन आणि संघटनेचा अत्तापर्यंतचा प्रवास याबद्दलची माहिती ऐकणे हा व्यवस्थापन शास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी आनंददायी अनुभव ठरला.

फक्त १३ सदस्यांची व्यवस्थापन समिती असलेल्या या डब्बावाला संस्थेमध्ये आज ५००० कामगार कार्यरत आहेत (यात ४ महिला कर्मचारी देखील आहेत.) तसेच सातत्य आणि वेळेचे योग्य नियोजन या फक्त दोनच पण मूलभूत तत्त्वांच्या जोरावर आज या संस्थेने Six Sigma मानपत्र देखील मिळवले आहे.

१९५६ मध्ये रजिस्टर झालेल्या या नूतन मुंबई डब्बावाला संस्थेतर्फे रोज सुमारे दोन लाख डबे व चार लाख व्यवहार हाताळले जातात आणि यासाठी या संस्थेने काही नियम/संकेत ठरविलेले आहेत. (जसे, दारू पिण्यास मनाई, ओळखपत्र, पांढऱ्या टोप्या घालणे इ.) व ते कटाक्षाने पाळलेही जातात. या नियमांचे/संकेताचे उल्लंघन

केल्यास रु. २५/- ते रु. १०००/- पर्यंतचा दंड आकारला जातो.

सगळ्यात आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे रोजचे हे सर्व चार लाख व्यवहार (डबे ग्राहकांच्या घरून कार्यालयात आणि कार्यालयातून पुन्हा घरी) पार पाडण्यासाठी जी संकेतिक पद्धती वापरली जाते. त्यासाठी कोणत्याही तांत्रिक प्रणालीचे सहाय्य घेतले जात नाही.

या सेवेकरिता सर्व ग्राहकांसाठी रु. ३००/- ते रु. ३५०/- (प्र. महिना) हा एकच प्रमाणित दर आकारला जातो. व ग्राहक देवो भव या भावनेने ही सेवा पुरवली जाते.

प्रिन्स चार्ल्स ची संस्थेला भेट ही या डब्बावाला संस्थेच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटना - की ज्यामुळे संस्थेला जगभरात मान मान्यता मिळाली. डॉ. अग्रवाल यांनी त्या भेटीचा वृतांतही आपल्या व्याख्यानात सांगितला.

संस्थेच्या भावी योजनांबद्दल विचारले असता फक्त आमच्या मुंबईसाठी सेवा पुढे सुरू ठेवण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली.

संस्थेच्या यशाचे श्रेय क्रमाने लोकल ट्रेन, सायकल आणि सर्व कर्मचाऱ्यांचे आहे असे सांगून त्यांनी व्याख्यानाचा समारोप केला.

खरोखरच हे व्याख्यान Human Resource, Finance Operation, IT, या व्यवस्थापनाच्या सर्वच शाखांच्या विद्यार्थ्यांसाठी एक चांगला व्यवस्थापनाचा धडा ठरले.

**वृत्त संकलन - अनुप्रिया जैन**
(MMS -III HR)

## वि. प्र. मंडळाचे तंत्र निकेतन

**राजीव गांधी अक्षय उर्जा दिन :**

दर वर्षी २० ऑगस्ट हा दिवस राजीव गांधी अक्षय उर्जा दिन म्हणून देशात साजरा करण्यात येतो. विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या इलेक्ट्रकिल पॉवर सिस्टिम विभागाच्या सिनर्जी ग्रुप व महाराष्ट्र एनर्जी डेव्हप्लमेंट एजन्सी (मेडा) याच्या संयुक्त विद्यमाने तंत्रनिकेतनात साजरा करण्यात आला.

उर्जेची समस्या ही जागतीक समस्या बनली असून प्रत्येक राष्ट्र आपआपल्या परिने ती समस्या सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे. भारतातील प्रत्येक राज्यास उर्जेचा तुटवडा जाणवत आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात तर १४-१५ तास लोडशोडिंग सामना करावा लागत आहे. अशा या जागतिक समस्येला विचार करता त्याची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न म्हणून असे दिन साजरे केले जातात की त्यातून काही सामाजिक संदेश, उद्‌बोधन केले जाते. असा कार्यक्रमातून उर्जेच्या समस्येविषयी लोकात जागरुतता निर्माण करणे व ती कमीत-कमी कशी वापरता येईल याचा विचार करणे. थोडक्यात असे म्हटले जाते की, विजेची बचत म्हणजेच विजेची निर्मिती होय. यासाठी नवीन पर्यायही शोधावे लागतात ह्यातच उत्तम उर्जेचा मार्ग महत्त्वाचा आहे.

या दिनानिमित्त तंत्रनिकेतनाने विभागीय स्तरावर शोध निबंध स्पर्धाचे आयोजन केले होते. या स्पर्धेमध्ये विविध तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यानी सहभाग घेतला होता. स्पर्धेमध्ये सोमय्या तंत्रनिकेतन, मुंबई, एस. एस. जोंधळे तंत्रनिकेतन, डोंबिवली, खोपोली तंत्रनिकेतन, खोपोली साबुसिद्दीकी तंत्रनिकेतन, मुंबई व वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन इत्यादी तंत्रनिकेतनांमधील विद्यार्थ्यी सहभागी झाले होते. या कार्यक्रमासाठी उर्जा तज्ज्ञ म्हणून एस. एस. अभ्यंकर,



राजीव गांधी अक्षय उर्जा दिनानिमित्त व्यासपीठावर बसलेले डावीकडून 'मेडा'चे प्रकल्प अधिकारी श्री. शिवाजीराव बोडके, तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि.कृ. नायक, IEEMA च्या प्रमुख स्वप्ना नाईक व बोलताना इलेक्ट्रिकल विभाग प्रमुख (वि.प्र.मंडळाचे, ठाणे) प्रा. सौ. निशा वडेर

IEEMA च्या स्वप्ना नाईक प्रमुख पाहुणे म्हणून, मेडाचे प्रकल्प अधिकारी श्री. शिवाजीराव बोडके, वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक, EPS विभागाच्या विभाग प्रमुख प्रा. सौ. निशा वडेर इत्यादी मान्य हजर होते.

शोध निबंध स्पर्धेत अनुक्रमे व्हीपीएम चे तंत्रनिकेतन ठाणे सोमय्या तंत्रनिकेतन, मुंबई व खोपोली तंत्रनिकेतन, खोपोली. या विद्यार्थ्यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषके पटकाविली. स्पर्धे दरम्यान परिक्षक म्हणून हिंद मोटर्सचे जनरल मॅनेजर सलील नेरूरकर, शासकीय तंत्रनिकेतनचे ईश्वर खुपसे, सरदार पटेल तंत्रनिकेतनच्या प्रा. अनुपा सबनीस यांनी काम पाहिले.

IEEMA च्या स्वप्ना नाईक व तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक यांनी उर्जा बचती सबंधी काय काय करता येईल या विषयी आपले विचार मांडले.

सदर कार्यक्रम तंत्रनिकेतच्या दृक्‌श्राव्य सभागृहात पार पडला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी वि.प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या EPS विभाग प्रमुख प्रा. सौ. निशा वडरे, सिनर्जी ग्रुपच्या सेक्रेटरी प्रा. सौ. सुषमा कुलकर्णी व मेडाचे प्रकल्प अधिकारी श्री. शिवाजीराव बोडके आदीनी विशेष परिक्रम घेतले.

**'शिक्षक दिन' उत्साहात साजरा :**

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे भारताचे पहिले उपराष्ट्रपती त्यानंतर ते राष्ट्रपती झाले. तत्त्वज्ञ, शिक्षणतज्ज्ञ म्हणूनही ते सुपरिचीत. UGC सारख्या शैक्षणिक संस्थेचे प्रमुख म्हणून ही त्यांनी कार्य केले आहे. विश्व विद्यालयात प्राध्यापक, कुलगुरु या नात्याने त्यांनी शैक्षणिक दृष्ट्या भरीव कामगिरी केली. त्यांच्या कार्याची महती सदैव लक्षात राहवी यादृष्टीने त्यांच्या ५ सप्टेंबर या जन्म दिनाचे औचित्य साधून भारत सरकार हा दिवस 'शिक्षक दिन' म्हणून साजरा करते. या वर्षीही तंत्रनिकेतनात ५ सप्टेंबर ह्या दिवशी २.३० ते ४.०० वा या वेळात तंत्रनिकेतनच्या दृक्‌श्राव्य सभागृहात शिक्षक दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी प्रा. एस.के. गभाणे हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले. त्यांनी



गुणवंत शिक्षकांचा सत्कार करताना प्रमुख पाहुणे प्रा. एस. के. गभाणे. सोबत तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना चित्रपारदर्शिका वापरून Students Motivation आणि Art of Living या विषयावर




**तंत्रनिकेतनात २० वर्षे सेवा झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याचा सत्कार करताना प्रमुख पाहुणे प्रा. एस. के. गभाणे सोबत प्रा. दि. कृ. नायक**

सुंदर शब्दात मार्गदर्शन केले.

प्रमुख पाहुण्याच्या हस्ते गुणवंत व शिक्षकांचा प्रशस्ति-पत्रक देवून सत्कार करण्यात आला. तंत्रनिकेतनमध्ये २० वर्षे सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांचाही प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी प्राचार्य दि. कृ. नायक यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

सदर कार्यक्रमाला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने हजर होते.


वृत्त संकलन
**चंद्रकांत शिंगाडे**
वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे


●●●

(पृ. २५ वरून)

**वामनराव मराठे - स्थितप्रज्ञ कार्यकर्ता**



**श्री. वामनराव पत्नी सौ. शीलाताई यांच्या समवेत**

एकमेकांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे आहात म्हणूनच हे शक्य झाले. परमेश्वराने तशी योजनाच केली असणार, दुसरं काय?

आपलं कार्यकर्तृत्व आणि जीवनशैली भावी पिढीला दीपस्तंभासारखी आहे. खरंतर विशेषांक काढावा असं आपल कार्य आहे. आपलं उर्वरित आयुष्य निरोगी, निरामय आणि आनंदी जावो आणि आपला शताब्दी सोहळा बघण्याचा योग आम्हाला प्राप्त होवो ही माऊली चरणी प्रार्थना!



**श्री. सुरेंद्र लागू**

२ / पहिला मजला,
यमुना सोसायटी,
गोविंद बच्चाजी रोड,
चरई, ठाणे
दूरध्वनी - २५३४९३४१


●●●

# गंगाधर गोपाळ गाडगीळ

**कथाकार, कादंबरीकार, अर्थतज्ज्ञ, समीक्षक**



- **जन्म :** २५ ऑगस्ट १९२३.
- **मृत्यू :** १५ सप्टेंबर २००८
- **शालेय शिक्षण :** आर्यन एज्युकेशन सोसायटी, गिरगाव.
- **महाविद्यालय :** विल्सन कॉलेज

  इतिहास व राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र या विषयात एम.ए. (१९४४)

  सुरतमधील भिकाभाई प्रेमचंद, मुंबईतील पोदार, रुपारेल आणि सिडेनहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापक.

  १९६४ साली मुंबईतील नरजी मोनजी कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड इकॉनॉमिक्सचे प्राचार्य.

  आपटे तसेच वालचंद उद्योगसमूहाचे आर्थिक सल्लागार.

  महाविद्यालयीन दिवसांपासूनच लेखनाची सुरुवात.

- **लेखनाचा श्रीगणेशा :**

  **पहिली कथा :** प्रिया आणि मांजर (१९४१)

  **पहिला संग्रह :** मानचित्रे (१९४६)

  १९४९ साली 'कडू आणि गोड' या कथेला अभिरुची मासिकाचे सर्वोत्कृष्ट कथेचे पारितोषिक

  १९५४ साली 'भिनलेले विष' या कथेला 'न्यूयॉर्क हेरल्ड ट्रिब्यून'चे पारितोषिक.

- **लेखनप्रवास व कथासंग्रह :**

कडू आणि गोड (१९४८)

नव्या वाटा (१९५०)

भिरभिरे (१९५०)

संसार (१९५१)

उद्ध्वस्त विश्व (१९५१)

कबुतरे (१९५२)

खरं सांगायचं म्हणजे (१९५४)

तलावातले चांदणे (१९५४)

वर्षा (१९५६)

ओले उन्ह (१९५७)

- **कादंबरी :**

लिलीचे फूल (१९५५)

दुर्दम्य (खंड १ : १९७० आणि खंड २ : १९७१)

(पृ. २७ वर)

(मुखपृष्ठावरून)

**संपादकीय**

## संस्कृतीच्या दिशांची दुर्दशा

रत्यावर उतरायचे, सर्वसामान्यांमध्ये एकप्रकारची दहशत निर्माण करायची, कर्णकर्कश आवाजात देहाला झटके द्यायचे आणि सामाजिक संकेत धाब्यावर बसवत आपले नेतृत्व वाजवत राहायचे ही आज प्रथा पडत आहे. लोकोपयोगाचे कोणतेही रचनात्मक काम न करता पाच पाच वर्षे प्रतिनिधी म्हणून केवळ हैदोस करायचा आणि वर आम्ही संस्कृतीची जोपासना करतो आहोत असा आव आणायचा, हे आजच्या राजकीय मंडळींचे सूत्र आहे. अपवाद असतील, पण ते नियम सिद्ध करण्यापुरतेच आहेत. संस्कृतीवर ताबा मिळवायला निघालेली ही नेते मंडळी ''आम्ही संस्कृतीची जोपासना केली'' अशी इतिहासाची पुस्तके छापून उद्याच्या पाठ्यक्रमात शिरवायला कमी करणार नाहीत.

या सण आणि उत्सवांच्या माध्यमांतून होणारे संस्कृतीचे विकृतीकरण इथवरच थांबत नाही. देशभरात अनेक ठिकाणी होणारे जातीय दंगे हे या विकृतीकरणाचेच फलित आहे. हे दंगे घडण्यात सामान्य जनतेला कोणताही रस नसतो. पण त्यांचा वापर करणे त्यांच्या भावनांना आव्हान करत हे जातीय दंग्यांचे लोण ही मंडळीच पसरवतात. स्वातंत्र्योत्तर भारताबद्दलची सर्व स्वप्ने धुळीला मिळवायला सिद्ध असणाऱ्या या नेतृत्वाला फक्त स्वार्थ कळतो. सामान्य माणूस हा त्यांच्या दृष्टीने 'एक मत' एवढाच महत्त्वाचा असतो. मग जातीय दंगे, उत्सवानंतरच्या मारामाऱ्या, पार्ट्या यांत किती का सामान्य माणसे मरेनात, यांना काही देणे घेणे नसते.

दुदैवाने अशा दूरदृष्टी नसलेल्या दिशाहीन दहशतवादी मंडळींच्या हातात देश आहे. कोणताही विवेक नसणारी ही मंडळी जर संस्कृतीचे पोवाडे गाणार असतील आणि स्वत:वर फुले उधळून घेणार असतील तर आंतरराष्ट्रीय स्तरावर देश म्हणून आपले हसे होईल. नेतृत्व करायचे असेल, लोकांचे प्रतिनिधित्व करायचे असेल तर या मंडळींनी रचनात्मक कार्याच्या दिशा शोधायला हव्यात. त्यासाठी सक्षम नेतृत्वाची समाजाला गरज आहे. संस्कृतीच्या नावाने विकृत वागण्यापेक्षा आपल्या कामातून आदर्श कार्य संस्कृती निर्माण केलेल्या नेत्यांचे कितीतरी आदर्श इतिहासात आहेत. त्यांचे नाव उच्चारण्याची लायकी आपल्याला यावी यासाठी तरी विधायक, सकारात्मक दृष्टीने यांनी वागावे. समान्य माणसांची ही अपेक्षा चूक ठरू नये!

•••

दि
शा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.



# श्री देवीची आरती

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी ॥
अनाथनाथे अंबे करूणा विस्तारी ॥
वारी वारी जन्मामरणांते वारी ॥
हारी पडलो आतां संकट निवारी ॥१॥
जयदेवी जयदेवी महिषासुरमर्दिनी ॥
सुरवरईश्वरवरदे तारक संजीवनी ॥धृ॥
त्रिभुवनी भुवनी पाहतां तुजऐसी नाहीं ॥
चारही श्रमले परंतु न बोलवे कांही ॥
साही विवाद करितां पडिलें प्रवाहीं ॥
ते तू भक्तांलागीं पावसि लवलाहीं ॥ जयदेवी॥२॥
प्रसन्न वदने प्रसन्न होसी निजदासां ॥
क्लेशांपासूनि सोडी तोडी भवपाशा ॥
अंबे तुजवाचून कोण पुरवील आशा ॥
नरहरी तल्लिन झाला पदपंकजलेशा ॥
जयदेवी जयदेवी महिषासुरमर्दिनी ॥
सुरवरईश्वरवरदे तारक संजिवनी ॥ जयदेवी जयदेवी॥३॥

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

☆ *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*

☆ *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*

☆ *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत, ३ रा मजला | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा.ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत, तळ मजला | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**☆ संपर्क ☆**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.